30 June 2026 page 01_Layout 1 6/29/2026 8:13 PM Page 1

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

मंगळवार ३० जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १८० | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Tuesday, 30 June 2026 | Year : 6 | Issue : 180 | Daily | Rate: Rs. 5/-

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत

संपर्क
अँड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१

दि. ३० जून 2026



१९३९- नागपूर येथील कोतवालांच्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

# १० वर्षांत नागपूर मनपाच्या ११२ शाळांना टाळे!





**नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे अवघ्या १० वर्षात मनपाच्या तब्बल अर्ध्या शाळांना टाळे लागले आहे. २०१६ मध्ये मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक मिळून २२५ शाळा होत्या, ही संख्या आता घटून अवघी ११३ वर आली आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे, १० वर्षापूर्वी मनपा शाळांमध्ये तब्बल २५ हजार असलेली विद्यार्थी पटसंख्या आता १४ हजारांवर आली असून, तब्बल ११ हजार विद्यार्थ्यांनी मनपा शाळांकडे कायमची पाठ फिरवली आहे. जीर्ण इमारती, भौतिक सुविधांचा प्रचंड अभाव आणि ढासळलेल्या शैक्षणिक दर्जामुळे दरवर्षी शाळा बंद पडत गेल्या. आता उरलेल्या ८५ प्राथमिक आणि २८ माध्यमिक शाळांचा डोलाराही शिक्षकांच्या अभावामुळे कोसळण्याच्या मार्गावर आहे.

१९९३ पासून (गेली ३३ वर्षे) शिक्षकांची बिंदुनामावली रखडल्यामुळे अधिकृत भरती पूर्णपणे ठप्प आहे. बंद पडलेल्या मनपाच्या शाळा मोक्याच्या ठिकाणी असल्याने आता या शाळांच्या जागेवर अनेकांचा डोळा आहे. भविष्यात या जागा खासगी विकासकांच्या ताब्यात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मनपाच्या शिक्षण समितीचे माजी सभापती गोपाल बोहरे यांनी आपल्या कार्यकाळात मनपा शाळांची स्थिती सुधारण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे ८ मनपा शाळांना चक्क 'आयएसओ' प्रमाणपत्र मिळाले होते. प्रत्येक शाळेला स्वतः भेट देऊन त्यांनी पिण्याच्या पाण्यापासून सर्व सुविधा दिल्या होत्या व दर तीन महिन्यांनी पाण्याच्या टाक्या साफ करण्याचे फर्मान सोडले होते. त्यांच्या काळात पटसंख्या २५ हजारांच्या पार होती. मात्र, आता परिस्थिती पूर्णपणे बदलली असून मोफत गणवेश देण्यापलीकडे पदाधिकाऱ्यांना इतर कोणत्याही सुविधांकडे लक्ष देण्यास वेळ नाही, अशी स्थिती आहे.

## पालकांमध्ये तीव्र असंतोष

शिक्षकांविना आणि सुविधांविना चालणाऱ्या या शाळांमुळे गोरगरीब आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांचे भवितव्य पार अंधारात ढकलले गेले आहे. प्रशासनाने वेळीच पावले उचलून ही दुरवस्था थांबवली नाही, तर उरलेल्या ११३ शाळाही लवकरच इतिहासजमा होतील, असा तीव्र संताप पालकांमधून व्यक्त केला जात आहे. शाळांमध्ये शिक्षकांची संख्या कमी असल्याने सध्या अनेक प्राथमिक शिक्षकांना माध्यमिक शाळांमध्ये नेऊन त्यांच्याकडून काम करून घेतले जात आहे, मात्र त्यांना वेतन केवळ प्राथमिक शिक्षकाचेच दिले जात असल्याचा संतापजनक प्रकारही समोर आला आहे.

## २०२६ नंतर उरणार फक्त २०९ शिक्षक; शाळा?

१ जुलैपासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू होत असताना मनपा शाळांमध्ये शिक्षकांची कमी आहे.

**प्राथमिक शाळा :** ३२८ शिक्षकांची गरज असताना सध्या केवळ २५९ शिक्षक कार्यरत आहेत.

**माध्यमिक शाळा :** २१० शिक्षकांची गरज असताना फक्त ९० शिक्षकांवर काम चालवले जात आहे.

डिसेंबर २०२६ मध्ये प्राथमिकचे १०० आणि माध्यमिकचे ४० असे एकूण १४० शिक्षक एकाच वेळी सेवानिवृत्त होत आहेत.

वर्षाअखेरपर्यंत संपूर्ण नागपूर महापालिकेकडे शाळा चालवण्यासाठी फक्त २०९ शिक्षक शिल्लक राहतील.

## सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी शिकवणे अनिवार्य आहे : शिक्षणमंत्री भुसे

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शिक्षण मंडळांअंतर्गत, इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सर्व माध्यमांतील आणि संलग्न शाळांमध्ये मराठी भाषेचे शिक्षण सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की, या नियमाची कठोरपणे अंमलबजावणी केली जाईल आणि त्याचे उल्लंघन करणाऱ्या शाळा व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल.राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत सांगितले की, सरकार राज्यभरात एक विशेष तपासणी मोहीम राबवणार आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व शाळांची तपासणी केली जाईल. कोणत्याही शाळेत मराठी भाषेचे शिक्षण अनिवार्य नसल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी विधानसभेत प्रश्न विचारून हा मुद्दा उपस्थित केला. चर्चेदरम्यान इतर आमदारांनीही पुरवणी प्रश्न विचारले. राज्यातील अनेक शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नाही, असा आरोप सदस्यांनी केला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर लावण्यात येणारा दंड अपुरा असून त्यांच्यावर प्रभावी कारवाई केली जात नाही, असेही ते म्हणाले. यावर उत्तर देताना शिक्षणमंत्री दादा भुसे म्हणाले की, राज्य सरकार मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल आणि कोणत्याही स्तरावरील हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले.

# उपवर्गीकरणा विरोधात २७ आमदारांची मुख्यमंत्र्यांपुढे कैफियत



**नागपूर :** आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात अनुसूचित जातीतील २७ आमदारांनी मुख्यमंत्र्यांची आज भेट घेतली. आपल्या भूमिकेची मांडणी केली. तसेच या आमदारांनी आपल्या सह्यांचे पत्र मुख्यमंत्र्यांना देऊन या निर्णयाला आपला ठाम विरोध असल्याचे ठणकावून सांगितले.

या प्रश्नावर उद्या ३० जून रोजी मुंबईत विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर, बौध्द महासभेचे भीमराव आंबेडकर, माजी सामाजिक न्यायमंत्री आ.राजकुमार बडोले, माजी मंत्री व चर्मकार समाजाचे नेते बबनराव घोलप आदी करणार आहेत. मोर्चात सहभागी होण्यास महाराष्ट्रभरातून महिला,पुरूष रवाना झाले आहेत. या मोर्चात उपवर्गीकरणाला विरोध करणारे बहुतेक सर्व आमदार आमदार सहभागी होणार आहेत. मुख्यमंत्र्यांना आमदारांनी एक निवेदन दिले. त्यावर महायुतीतील दोन मंत्र्यांनी देखील स्वाक्षरी केली आहे. जाती-जातींमध्ये फूट पाडण्याचा आणि समाजात संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप यावेळी आमदारांनी केला. तसेच, बिदर समितीचा अहवाल सार्वजनिक होईपर्यंत कोणत्याही प्रकारची पुढील कार्यवाही करू नये, अशी मागणीही मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली. आता या विषयावर मुख्यमंत्री काय निर्णय घेतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## उपवर्गीकरणा विरोधात आमदारांची मुख्यमंत्र्यांपुढे कैफियत

### स्थगन प्रस्ताव व अल्पकालीन चर्चा होणार



**नागपूर :** आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात अनुसूचित जातीतील आमदारांनी मुख्यमंत्र्यांची आज त्यांच्या दालनात भेट घेतली. तसेच आपल्या भूमिकेची मांडणी केली. तसेच या आमदारांनी आपल्या सह्यांचे पत्र मुख्यमंत्र्यांना देऊन या निर्णयाला आपला ठाम विरोध असल्याचे ठणकावून सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर बैठक घेण्याचे मान्य केले. या प्रश्नावर उद्या मुंबईत विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर, बौध्द महासभेचे भीमराव आंबेडकर , माजी सामाजिक न्यायमंत्री आ.राजकुमार बडोले, माजी मंत्री व चर्मकार समाजाचे नेते बबनराव घोलप आदी करणार आहेत. मोर्चात सहभागी होण्यास महाराष्ट्रभरातून महिला,पुरूष रवाना झाले आहेत. या मोर्चात उपवर्गीकरणाला विरोध करणारे बहुतेक सर्व आमदार सहभागी होणार आहेत. मुख्यमंत्र्यांना आमदारांनी एक निवेदन दिले. त्यावर महायुतीतील दोन मंत्र्यांसह २७ आमदारांनी स्वाक्षरी केली आहे. या प्रश्नावर उद्या ३० जूनला विरोधी पक्षांकडून विधान सभेत स्थगन प्रस्ताव आणि ६ जुलै रोजी अल्पकालिन चर्चा होणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे या प्रश्नावर सभागृह गाजेल. जाती-जातींमध्ये फूट पाडण्याचा आणि समाजात संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप यावेळी आमदारांनी केला. तसेच, बिदर समितीचा अहवाल सार्वजनिक होईपर्यंत कोणत्याही प्रकारची पुढील कार्यवाही करू नये, अशी मागणीही मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली. आता या विषयावर मुख्यमंत्री काय निर्णय घेतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# महत्वाच्या बातम्या

## अरुणाचल प्रदेशात पूर आणि भूस्खलनाने हाहाकार

**नवी दिल्ली :** अरुणाचल प्रदेशातील १२ जिल्ह्यांमध्ये सततच्या मुसळधार पावसामुळे आलेल्या पूर आणि भूस्खलनाचा हजारो लोकांना फटका बसला आहे. राज्यातील २८ जिल्ह्यांपैकी अनेक भागांमध्ये परिस्थिती गंभीर असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, २३ जून रोजी आलेल्या अचानक आलेल्या पुराचा सर्वाधिक फटका बसलेल्या केई पानायोर जिल्ह्यात मृतांची संख्या तीन झाली आहे. ४८ वर्षीय सौरभ कुमार खरवार यांचा मृतदेह रविवारी पापुमपारे जिल्ह्यातील हवा कॅम्पजवळून सापडला. बुधवारी आणि शनिवारी, एका ३५ वर्षीय महिलेसह इतर दोन जणांचे मृतदेह सापडले. एका अल्पवयीन मुलासह दोघे जण अजूनही बेपत्ता आहेत. केई पानायोरच्या याजाली सर्कलमध्ये मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरामुळे सुमारे २० घरे आणि इतर इमारतींचे नुकसान झाले आहे.

## भारतातील ३१५ जिल्ह्यांवर दुष्काळाचे सावट!

### अल निनो'ने उष्णतेच्या आगीत तेल ओतले

**नवी दिल्ली :** 'अल निनो'मुळे जगातील अनेक देशांमध्ये प्रचंड उष्णता वाढली आहे. फ्रान्समध्ये एक हजार लोकांचा मृत्यू झाला आहे. भारतातही अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याचा इशारा व्यक्त केला गेला आहे. जगभरात उष्णतेचे विक्रम मोडीत निघू लागले आहेत. उष्णतेमुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. फ्रान्समध्ये उष्णतेमुळे १००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. जर्मनी, स्पेन, ब्रिटनसह अनेक युरोपीय देशांमध्ये इतकी तीव्र उष्णता पडत आहे की रस्ते वितळत आहेत. या वर्षीसारखे तापमान आजपर्यंत कधीच पाहिले नाही, असे लोक म्हणू लागले आहेत. भारतातही अनेक भागांमध्ये कडक उन्हाचा तडाखा बसत आहे. राजधानी दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, राजस्थान या सारख्या राज्यांमध्ये अजूनही व्यवस्थित पाऊस झालेला नाही. तर वाढत्या तापमानांमागे 'अल निनो' हे सर्वात मोठे कारण असल्याचे सांगितले जात आहे. आता अल निनोबाबत आलेली नवीन अपडेट चिंता आणखी वाढवणारी आहे.

## अनुभवी मल्लिकार्जुन खर्गेंची राज्यसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी पुनर्निवड

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची राज्यसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी पुनर्निवड करण्यात आली आहे. खर्गे यांनी सोमवारी राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांच्या कक्षात खासदारकीची शपथ घेतली. यानंतर २६ जून २०२६ पासून खर्गे यांना पुन्हा राज्यसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून नियुक्त करण्यात आले. मल्लिकार्जुन खर्गे यांचा राज्यसभेतील कार्यकाळ २५ जून २०२६ रोजी समाप्त झाला होता. नियमांनुसार २६ जूनपासून त्यांचे विरोधी पक्षनेतेपद देखील समाप्त झाले. पण, त्यानंतर राज्यसभेच्या झालेल्या निवडणुकीत खर्गे पुन्हा निवडून आले. राज्यसभेचे खासदार झाल्यानंतर त्यांची विरोधी पक्षनेतेपदी पुनर्निवड करण्यात आली. २६ जून २०२६ पासूनच त्यांना पुन्हा विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता देण्यात आली आहे. खर्गे यांच्या शपथविधीला सोनिया गांधी आणि खासदार प्रियांका गांधी उपस्थित होत्या.

## २ जुलैला समान नागरी संहितेचा मसुदा मंत्रिमंडळात सादर...

**कोलकाता :** पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी सोमवारी घोषणा केली की, समान नागरी संहिता (यूसीसी) विधेयकाचा मसुदा २ जुलै रोजी राज्य मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल. त्यांनी ही माहिती विधानसभेत दिली. मुख्यमंत्री शुभेंदू यांनी अशीही घोषणा केली की, समान नागरी संहिता विधेयकाचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली जाईल. मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, हे विधेयक नंतर विधानसभेतही सादर केले जाईल. या प्रस्तावित कायद्याचा उद्देश विवाह, घटस्फोट, वारसा हक्क आणि दत्तक यांसारख्या बाबींमध्ये धर्माच्या पलीकडे जाऊन एक समान नागरी संरचना लागू करणे हा आहे. समान नागरी संहिता म्हणजे भारतात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकासाठी, त्याचा धर्म किंवा जात विचारात न घेता, एकच कायदा असणे. समान नागरी संहितेच्या अंमलबजावणीमुळे, सर्व धर्मांसाठी एकच कायदा असेल. विवाह, घटस्फोट, दत्तकविधान आणि मालमत्तेची विभागणी या बाबींमध्ये सर्व धर्मांना तोच कायदा लागू होईल.

# एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकातून शिवरायांच्या साम्राज्याचा नकाशा वगळला : डॉ. नितीन राऊत

**नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे सरकार सत्तेवर असून महाराजांच्या अथांग मराठा साम्राज्याचा 'अटक ते कटक' विस्तार दर्शवणारा नकाशा एनसीईआरटीने (NCERT) पाठ्यपुस्तकातून वगळला आहे. ही बाब अत्यंत धक्कादायक असून, छत्रपतींच्या गौरवशाली इतिहासाची ही मोडतोड महाराष्ट्राला कधीही मान्य होणार नाही, अशा शब्दांत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा आमदार डॉ. नितीन राऊत यांनी विधिमंडळात राज्य सरकारला धारेवर धरले.

बालभारतीच्या पाठ्यपुस्तकांमधील त्रुटींवर बोट ठेवतांना डॉ. राऊत यांनी तीव्र संताप व्यक्त केला. इयत्ता ६ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात महाराष्ट्राचे केवळ १ नृत्य दाखवून इतर चार नृत्ये राज्याबाहेरील दाखवली जातात. तसेच, सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी 'भारतातील' पहिली शाळा काढली असताना, पुस्तकात केवळ 'महाराष्ट्रातील' असा संकुचित उल्लेख करून इतिहासाची मोडतोड केली जात आहे, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. ही अक्षम्य चूक करणाऱ्या तज्ज्ञ समितीवर शासन कोणती फौजदारी किंवा दंडात्मक कारवाई करणार, असा खडा सवाल त्यांनी केला.

> मराठा साम्राज्याचा नकाशा हा केवळ कागदाचा तुकडा नाही, तर तो आपल्या शौर्याचा आणि पराक्रमाचा जिवंत पुरावा आहे. जेव्हा विद्यार्थी तो नकाशा पाहतात, तेव्हाच त्यांना उमजते की मराठ्यांच्या घोड्यांनी अफगाणिस्तानच्या सीमेपर्यंत मजल मारून सिंधू नदीचे पाणी प्यायले होते. तो नकाशा हटवून मराठा साम्राज्याचा पराक्रम पुसण्याचा हा प्रयत्न आहे, असा थेट आरोप त्यांनी केला.

> न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल सार्वजनिक न करता हरकतींसाठी अवघ्या पाच दिवसांची मुदत देणे, हा प्रकार लोकशाहीचा खून करणारा आहे, शासकीय नोकऱ्यांचे खाजगीकरण होत असल्याने जागाच उपलब्ध नसतांना आरक्षणाचे तुकडे करणे म्हणजे 'शून्याचे विभाजन' करण्यासारखे आहे. मूळ प्रश्नांवरून लक्ष भरकटवून समाजात कृत्रिम संघर्ष उभा करण्याचा हा राजकीय डाव आहे का?





आरटीआयच्या माध्यमातून मिळालेल्या धक्कादायक माहितीनुसार, आगामी २०२६-२७ शैक्षणिक वर्षाच्या पाठ्यपुस्तकातही हा नकाशा असणार नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. राज्य सरकारने अवघ्या दोन महिन्यांत राजकीय दबाव आणून स्वतःच्या इतिहासातील 'तत्परता' दाखवली आहे. मग त्याच राज्य सरकारने गेल्या आठ-नऊ महिन्यांत या चुकीच्या पाठ्यपुस्तकांविरोधात दिल्लीत नेमका काय पाठपुरावा केला, असा थेट प्रश्न डॉ. राऊत यांनी उपस्थित केला.

मराठा साम्राज्याचा नकाशा नसल्यामुळे इतिहासाची भव्यता अधुरी वाटत आहे. आज सामान्य शिवप्रेमींना न्याय मिळवण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागत आहे, हे या राज्य सरकारचे मोठे अपयश आहे, अशी जोरदार टीका डॉ. राऊत यांनी केली. आता यावर 'अटक ते कटक' असा विस्तार दर्शवणारा नकाशा पुन्हा समाविष्ट करण्यासाठी राज्य सरकार दिल्ली दरबारी काय भूमिका घेते आणि शिवरायांचा गौरव पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी किती तत्परता दाखवते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## मराठी सक्तीचा कायदा : दंडाची रक्कम १० लाख करण्याची मागणी

मराठी सक्तीच्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याबाबत बोलताना डॉ. राऊत म्हणाले की, *'शासनाने मे २०२६ मध्ये अनेक केंद्रीय व खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळा दोषी असल्याचे मान्य केले आहे. सध्या कायद्यात १ लाख रुपयांपर्यंत दंड करण्याची तरतूद आहे, ती अत्यंत कमी आहे. ही दंडाची रक्कम वाढवून १० लाख रुपये करण्यात यावी,'* अशी आग्रही मागणी त्यांनी केली. केवळ कागदी भाषा न करता दोषी शाळांकडून दंड वसूल करून कठोर कारवाई का केली जात नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## आरक्षणाचे उपवर्गीकरण म्हणजे संविधानाच्या भावनेवर आघात : डॉ. नितीन राऊत

**नागपूर :** राज्यातील ५९ अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण करण्याचा राज्य सरकारचा निर्णय म्हणजे संविधानाच्या मूळ चौकटीला सुरुंग लावणारा आणि आरक्षणाला नख लावणारा प्रयत्न आहे, अशी सडकून टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि आमदार डॉ. नितीन राऊत यांनी आज विधानसभेत केली. मुंबईत मंत्रालयावर धडकलेल्या 'निळ्या वादळा'च्या पार्श्वभूमीवर, त्यांनी आरक्षणाबाबतच्या या संशयास्पद हालचालींवरून सरकारला धारेवर धरले. डॉ. राऊत यांनी सभागृहात आरक्षणाच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका मांडताना सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने ३१ जुलै २०२४ च्या आपल्या ऐतिहासिक निर्णयात उपवर्गीकरण करण्यासाठी ठोस आणि वैज्ञानिक 'क्वांटिफाईड' व 'एम्पिरिकल' डेटा असणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले होते. राज्यात जातनिहाय जनगणना आणि सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण अद्याप सुरूच असताना, कोणताही अंतिम निष्कर्ष हाती नसताना सरकार कोणत्या 'गुप्त' आकडेवारीच्या आधारे हा निर्णय घेत आहे? अशा प्रकारची घाई ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचा थेट अवमान करणारी आहे, असेही त्यांनी नमूद केले. डॉ. राऊत यांनी मांडलेल्या या मुद्द्यांमुळे सभागृहात सरकारची चांगलीच कोंडी झाली आहे. आता हे सरकार आरक्षणाबाबतच्या या प्रक्रियेवर काय भूमिका घेते आणि सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी काय पावले उचलते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.







“ चुकांमधून शिकणे हे प्रगतीचे चिन्ह आहे. ”



बहुजन सौरभ संपादकीय

# टीईटी पेपरफुटी दोषी कोण? बळी कोण?

क्षण हा कोणत्याही राष्ट्राचा कणा मानला जातो. त्या शिक्षणाचा पाया म्हणजे शिक्षक आणि शिक्षकांची निवड जर भ्रष्टाचार, पैशांची देवाणघेवाण आणि पेपरफुटीच्या आधारे होत असेल, तर तो केवळ शिक्षण क्षेत्रावरील डाग नसून संपूर्ण राष्ट्राच्या भविष्यावर झालेला हल्ला आहे. महाराष्ट्रातील टीईटी (Teacher Eligibility Test) पेपरफुटी प्रकरणाने हेच भीषण वास्तव उघड केले आहे. तपासात हे केवळ राज्यापुरते मर्यादित नसून आंतरराज्यीय रॅकेट असल्याचे स्पष्ट झाले आहे. काही आरोपी अटकेत आहेत, तर अनेक अजूनही फरार आहेत. मात्र या संपूर्ण घोटाळ्यात एक प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात उभा राहतो, या व्यवस्थेला जबाबदार कोण आणि या व्यवस्थेचा बळी कोण? आज हजारो पात्र, गुणवंत आणि प्रामाणिक युवक-युवती शिक्षक होण्याचे स्वप्न घेऊन वर्षानुवर्षे अभ्यास करतात. गरीब पालक कर्ज काढून मुलांना शिकवतात. अनेक उमेदवार नोकरीच्या आशेने आयुष्याची सर्वोत्तम वर्षे स्पर्धा परीक्षांमध्ये घालवतात. पण जेव्हा परीक्षेच्या आदल्या रात्री प्रश्नपत्रिका लाखो रुपयांत विकल्या जातात, तेव्हा त्या विद्यार्थ्यांचा पराभव होत नाही; तर संविधानाने दिलेल्या समान संधीच्या अधिकाराचा खून होतो. टीईटी पेपरफुटी हा केवळ एक गुन्हा नाही. हा संघटित आर्थिक गुन्हा आहे. यात दलाल, पेपर छापणाऱ्या संस्था, तांत्रिक यंत्रणा, काही भ्रष्ट अधिकारी, राजकीय संरक्षण आणि पैशाच्या जोरावर नोकरी मिळवू पाहणारे उमेदवार अशा संपूर्ण साखळीचा सहभाग असल्याशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणात प्रश्नपत्रिका बाहेर पडू शकत नाहीत. त्यामुळे केवळ एखादा कर्मचारी किंवा एजंट अटक करून प्रकरण संपविणे म्हणजे मूळ रोगावर उपचार न करता फक्त ताप उतरविण्यासारखे आहे. या प्रकरणात सर्वात मोठा बळी ठरला आहे तो प्रामाणिक शिक्षक उमेदवार. ज्यांनी दिवस-रात्र अभ्यास केला, प्रामाणिकपणे परीक्षा दिली, त्यांच्यावर संशयाची सावली पडली. प्रत्येक निवड झालेल्या शिक्षकाकडे संशयाने पाहिले जाऊ लागले. काही भ्रष्ट उमेदवारांमुळे संपूर्ण शिक्षक समाजाची प्रतिष्ठाच धुळीस मिळाली. हा अन्याय आहे. दुसरा मोठा बळी म्हणजे विद्यार्थी. कारण पैसे देऊन नोकरी मिळवणारा शिक्षक ज्ञान देण्यापेक्षा गुंतवणूक वसूल करण्याचा विचार करेल, अशी भीती समाजात निर्माण झाली आहे. शिक्षक हा मुलांसाठी आदर्श असतो. जर शिक्षक पदच भ्रष्टाचारातून मिळाले, तर विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणाचे संस्कार कोण करणार? तिसरा बळी आहे समाजाचा शासनावरील विश्वास. प्रत्येक पेपरफुटीनंतर सरकार चौकशी जाहीर करते, विशेष तपास पथक नेमते, आरोपींना अटक होते, पण काही महिन्यांनी लोक सर्व काही विसरतात आणि पुन्हा दुसऱ्या परीक्षेचा पेपर फुटतो. ही पुनरावृत्ती दाखवते की कारवाईपेक्षा व्यवस्थेतील दोष अधिक गंभीर आहेत. सरकारने स्वतःलाही काही कठोर प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. परीक्षा प्रक्रियेचे डिजिटल संरक्षण पुरेसे का नव्हते? प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी कोणाची होती? प्रत्येक पेपरफुटीनंतर त्याच त्या आश्वासनांपलीकडे कायमस्वरूपी उपाय का होत नाहीत? तपासाचा वेग मोठ्या आरोपींपर्यंत का पोहोचत नाही? या प्रश्नांची उत्तरे जनतेला हवी आहेत. तितकेच आत्मपरीक्षण उमेदवारांनीही करणे आवश्यक आहे. नोकरीसाठी लाखो रुपये देणारा उमेदवारही तितकाच दोषी आहे. कारण लाच देणारा नसता तर लाच घेणारा टिकला नसता. भ्रष्ट व्यवस्थेला मागणी मिळते म्हणूनच ती वाढते. त्यामुळे ‘कोणीतरी पैसे घेतले’ एवढेच नव्हे, तर ‘कोणीतरी पैसे दिले’ हेही वास्तव समाजाने स्वीकारले पाहिजे. आज आवश्यक आहे ती केवळ आरोपींना अटक नव्हे, तर संपूर्ण परीक्षा व्यवस्थेची पुनर्रचना. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते परीक्षा केंद्रांपर्यंत प्रत्येक टप्प्यावर अत्याधुनिक तांत्रिक सुरक्षा, स्वतंत्र परीक्षा प्राधिकरण, जबाबदारी निश्चित करणारी कठोर कायदेशीर तरतूद आणि पेपरफुटीला देशद्रोहासमान गंभीर आर्थिक गुन्हा मानून जलदगती न्यायालयात खटले चालविण्याची गरज आहे. दोषी अधिकाऱ्यांची सेवा समाप्ती, संपत्ती जप्ती आणि आजीवन शासकीय सेवेस अपात्रता यांसारख्या कठोर शिक्षा झाल्याशिवाय हा रोग थांबणार नाही. शिक्षक हा समाजाचा शिल्पकार आहे. जर शिल्पकारच भ्रष्ट मार्गाने घडला, तर पुढील पिढीचे भविष्य कोण घडविणार? आज शिक्षक समाज कमालीच्या अस्वस्थतेत आहे. कारण काही मोजक्या भ्रष्ट लोकांनी संपूर्ण शिक्षक वर्गाला संशयाच्या भोवऱ्यात ढकलले आहे. या प्रामाणिक शिक्षकांना न्याय मिळणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. टीईटी पेपरफुटीचे हे प्रकरण केवळ न्यायालयातील गुन्हा म्हणून न पाहता राष्ट्राच्या नैतिक अधःपतनाचा इशारा म्हणून पाहिले पाहिजे. शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराला जर आजच आळा घातला नाही, तर उद्याचा शिक्षक, उद्याचा अधिकारी आणि उद्याचा नागरिक यांच्याकडून प्रामाणिकपणाची अपेक्षा करण्याचा नैतिक अधिकार समाज गमावेल. आता प्रश्न आरोपींच्या अटकेचा नाही; प्रश्न आहे व्यवस्थेच्या शुद्धीकरणाचा. कारण दोषी तुरुंगात गेले तरी चालतील, पण जर व्यवस्था बदलली नाही तर उद्याचा पेपर पुन्हा फुटेल आणि पुन्हा एखाद्या गुणवंत तरुणाचे स्वप्न चिरडले जाईल. शिक्षण वाचवायचे असेल तर परीक्षा व्यवस्थेचे राजकारणमुक्त, भ्रष्टाचारमुक्त आणि पूर्णपणे पारदर्शक पुनरुज्जीवन हा एकमेव पर्याय आहे. अन्यथा टीईटीसारखे घोटाळे ही अपवादात्मक घटना राहणार नाहीत, तर तीच नवी व्यवस्था बनेल आणि ते कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी अत्यंत घातक ठरेल. ●●



## सुत्त पिटक
# माणसाच्या अंतरंगाशी संवाद

बौद्ध पत्रकारिता-११



भूपेंद्र गणवीर
मो. 9850031019

विनय पिटक पत्रकारितेचा कणा आहे. तर सुत्त पिटक तिचा आत्मा आहे. सुत्त पिटक म्हणजे बुद्धांच्या उपदेशांचा, संवादांचा आणि जीवनदृष्टीचा अमर महासागर आहे. यात दीघ निकाय, मज्झिम निकाय, संयुत्त निकाय, अंगुत्तर निकाय आणि खुद्दक निकाय हे पाच महान संग्रह आहेत. या प्रत्येक निकायात केवळ धम्म नाही, तर संवाद कलेचे, लोक शिक्षणाचे, समाज जागृतीचे आणि जनसंपर्काचे अद्भुत तत्त्वज्ञान दडलेले आहे. आजच्या भाषेत सांगायचे झाले. तर सुत्त पिटक हे जगातील सर्वात प्राचीन आणि सर्वात मानवी पत्रकारिता विद्यालय आहे. पत्रकारितेचा मूळ हेतू काय? सत्ता खूश ठेवणे? प्रेक्षक वाढवणे? भीती विकणे? की समाजाला जागृत करणे? हा प्रश्न ऐकविसाव्या शतकात विचारला जात आहे. बुद्धांनी अडिच हजार वर्षा अगोदर उत्तर दिले आहे. सत्य सांगा. पण असे सांगा की त्यातून वैर नव्हे तर विवेक निर्माण होईल. याच अर्थाने बौद्ध पत्रकारितेचा सर्वोच्च आधार म्हणजे सुत्त पिटक होय.

> जेव्हा जगात हिंसा वाढते. तेव्हा शस्त्रांचा आवाज मोठा होतो. करुणा वाढते. तेव्हा शब्दांचा आवाज अधिक प्रभावी ठरतो. इतिहास सांगतो. तलवारींनी राज्ये जिंकली. शब्दांनी मने जिंकली. मने जिंकणारे शब्द जर कोणाच्या ओठांतून आले असतील? तर ते तथागत बुद्धांचे ओठातून आले होते. हे जगाने मान्य केले. त्यामुळेच भारताला विश्वगुरू मानले. हे सत्य आहे. विनय पिटक आपल्याला शिस्त शिकवते. काय करावे. काय टाळावे. कसे वागावे, हे सांगते. तर सुत्त पिटक माणसाच्या अंतरंगाशी संवाद साधते. कसे बोलावे. कसे लिहावे. कसे विचार मांडावे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कसे सत्य सांगावे. हे शिकवते.

सरळ, स्पष्ट आणि प्रभावी भाषा- ही जनतेच्या हृदयाची भाषा आहे. बुद्धांचे एक वैशिष्ट्य जगभर मान्य झाले. त्यांनी लोकांच्या भाषेत संवाद साधला. ते विद्वत्तेचा दिखावा करत नव्हते. ते शब्दांनी लोकांना चकित करत नव्हते. ते शब्दांनी लोकांना जागे करत होते. त्यांच्या भाषेत तत्त्वज्ञान होते. गुंतागुंत नव्हती. गहनता होती. अहंकार नव्हता.ते सांगतात,“जसा माणूस हातात दिवा घेऊन अंधारातून मार्ग शोधतो. तसा ज्ञानाचा प्रकाश अज्ञान दूर करतो. किती साधी प्रतिमा! पण त्यात किती मोठे सत्य आहे. या सत्यापासून आणि जनतेपासून आजची पत्रकारिता दूर गेली आहे. तिच्यात अवघड परकीय शब्द आले. अर्थ न कळणारी संज्ञा आली. कृत्रिम भाषा आली. अन्‌ मुद्दा, चर्चेच्या नावावर गोंधळ वाढला. यामुळे सामान्य माणूस बातम्या वाचतो. पण समजून घेत नाही. सुत्त पिटक बौद्ध पत्रकारितेला सांगते. “तुम्ही किती शिकलात यास महत्त्व नाही. यापेक्षा तुम्ही लिहिले. सांगितले. ते किती लोकांना समजले . हे महत्त्वाचे आहे. एखादी अर्थसंकल्पाची बातमी असेल. तर ती आकड्यांचा जंगल बनवू नका. त्या आकड्यांमुळे शेतकरी, विद्यार्थी, महिला, कामगार यांच्या जीवनात काय बदल होणार हे सांगावयास हवे. हे होत नाही. पत्रकाराचा शब्द लोकांपर्यंत पोहोचला नाही. तर तो शब्द मृत ठरतो.

कथा आणि उपमा- तथ्याला हृदय द्या. सुत्त पिटकातील दुसरे मोठे वैशिष्ट्य म्हणजे कथा. बुद्ध केवळ उपदेश देत नव्हते. ते अनुभव सांगत होते. ते दृश्य उभे करत होते. हत्ती आणि अंध व्यक्तींची कथा. प्रत्येकाला सत्याचा एक भाग दिसतो. विषारी बाणाची कथा. जखमी माणूस बाण कोणी मारला. हे विचारत बसत नाही.आधी उपचार करतो. नदी आणि सागराची उपमा. लहान प्रवाह शेवटी महासागरात एकरूप होतात. ही केवळ धम्म उदाहरणे नाहीत. ही संवादाची महान कला आहे.आज पत्रकारितेत माहिती आहे. पण त्यात माणूस हरवला आहे. एक बातमी लिहिली जाते “शेतकऱ्याची आत्महत्या.” बस्स. सुत्त पिटक विचारते,त्याचे नाव काय होते? त्याची स्वप्ने काय होती? त्याच्या मुलीचे शिक्षण थांबले का? त्याच्या आईने शेवटचे काय विचारले? तथ्य डोक्याला भिडते. कथा हृदयाला भिडते. बौद्ध पत्रकारिता सांगते. माहितीला मानवी चेहरा द्या. कारण समाज बदलतो. तो आकड्यांनी नाही. तर वेदना समजून घेतल्याने बदलतो. ती वेदना मांडणे ही पत्रकाराची खरी कसोटी आहे. त्यासाठी घटनेच्या तपशिलात जावे लागते. घटनेचा उगम शोधावे लागते.

भावनिक गहनता- पण उत्तेजन नव्हे. आजची माध्यमे अनेकदा भावना विकतात. भय. राग. धक्का. सनसनाटी. आरडाओरडा. शब्द जास्त. समज कमी. सुत्त पिटक याच्या अगदी उलट मार्ग दाखवते. बुद्धांची भाषा भावनिक आहे. पण ती भडकावत नाही. ती संतुलित करते.ती जखम दाखवते.पण सूड शिकवत नाही. ती दुःख सांगते. पण आशा हिरावून घेत नाही. बौद्ध पत्रकारितेचा हा अत्यंत महत्त्वाचा नियम आहे. भावना निर्माण करा; भावनिक शोषण करू नका.जेव्हा समाजात तणाव असेल. तेव्हा पत्रकाराने पेट्रोल नव्हे, प्रकाश बनावे. शब्द आगही असतात. शब्द दीपही असतात.आज प्रश्न असा आहे. आपण कोणते शब्द निवडतो?

प्रश्न विचारण्याची कला- हे पत्रकारितेचे सर्वात शक्तिशाली अस्त्र होय. बुद्धांनी लोकांना तयार उत्तर दिली नाहीत. ते प्रश्न विचारत. “तुला काय वाटते?” “हे कसे शक्य आहे?” “तू स्वतः अनुभवले आहेस का?” हे प्रश्न केवळ संवाद नव्हते. ते आत्मजागृतीचे साधन होते. पत्रकारितेचे सर्वात मोठे कामही हेच आहे. प्रश्न विचारणे.कारण प्रश्न म्हणजे बंड नाही. प्रश्न म्हणजे सत्याचा शोध. सत्तेला प्रश्न. समाजाला प्रश्न. स्वतःलाही प्रश्न. आज अनेकदा पत्रकारिता निष्कर्ष आधी ठरवते आणि प्रश्न नंतर शोधते. आजची पत्रकारिता नेत्यांना, सत्तेला प्रश्न विचारणेच विसरली. ही पत्रकारिता नव्हे.पत्रकारितेचे केवळ सोंग आहे. ही पत्रकारिता जनकल्याण करीत नाही. ती सत्तेची, राजकारण्याची, मठाधिशांची केवळ पालखी ओढते. सुत्त पिटक म्हणते. प्रश्न आधी विचारा. उत्तर समाज शोधेल. का? हा शब्द जग बदलतो. गरीबी का? असमानता का? अन्याय का? शिक्षण महाग का? शेतकरी असुरक्षित का?ज्या समाजात प्रश्न मरतात. तिथे लोकशाही कमकुवत होते. आज देशात हीच स्थिती आहे.

मौन आणि योग्य वेळ- प्रत्येक गोष्ट बोलण्याची नसते. सुत्त पिटकातील सर्वात गहन शिकवण म्हणजे मौन. कारण प्रत्येक प्रश्न उत्तरासाठी नसतो. काही वेळा मौनच अधिक अर्थपूर्ण असते.आज माहितीचा पूर आहे. प्रत्येक मिनिटाला प्रतिक्रिया आहे. प्रत्येक घटनेवर मत आहे. प्रत्येक विषयावर निर्णय आहे.पण विचारासाठी वेळ नाही.बौद्ध पत्रकारिता सांगते. तत्काळ बोलणे म्हणजे सत्य नव्हे. कधी थांबा. तपासा. समजा. मग बोला. काही वेळा शांतता हीच सर्वांत मोठी घोषणा असते. पत्रकाराने वेगापेक्षा विवेक निवडला पाहिजे. सुत्त पिटकात शब्दांची नैतिकता आहे. सुत्त पिटक केवळ ग्रंथ नाही. तो शब्दांचे उत्तरदायित्व आहे. तो शिकवतो. शब्दांनी समाज तुटू शकतो. शब्दांनी समाज उभाही राहू शकतो. पत्रकार म्हणजे फक्त माहिती पोहोचवणारा व्यक्ती नाही.

तो विचारांचे दरवाजे उघडणारा असतो. आजच्या काळात असत्य, द्वेष, विभाजन, प्रचार आणि भीती यांच्या धुराने वातावरण भरलेले आहे.अशा वेळी सुत्त पिटक आपल्याला पुन्हा आठवण करून देते. सत्य बोला. करुणेने बोला. योग्य वेळी बोला. जे उपयुक्त आहे तेच बोला. बौद्ध पत्रकारिता म्हणजे सुत्त पिटकाची आधुनिक अभिव्यक्ती आहे. ज्यात तथ्य आहे. त्यात करूणा आहे. ज्यात भावना आहेत. सोबतीला विवेक आहे. करूणाहिन विवेकहिन सत्य अर्थहीन असते. ज्यात प्रश्न आहेत. पण द्वेषाशिवाय नाहीत.ज्यात परिवर्तन आहे. पण हिंसेशिवाय नाही.जो पत्रकार सुत्त पिटकाच्या या आत्म्याने लिहितो. तो केवळ बातमी देत नाही.तो मन उजळवतो. तो समाजाला आरसा दाखवतो. तो काळाला दिशा देतो. आणि म्हणूनच बुद्धांचा तो शांत, गहन, अमृतमय स्वर आजही घुमतो आहे. “सुंदर शब्द पुरेसे नाहीत. ते शब्द सुंदर कृतीत उतरले पाहिजेत.” तेव्हा पत्रकार हा केवळ लेखक राहत नाही. तो धम्माचा वाहक बनतो. तो जनतेचा विश्वास बनतो. ●●

# सामाजिक न्याय दिनाचे निमित्ताने....

**सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज यांचा जन्मदिवस शासन प्रशासन सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा करीत असते. सामाजिक न्याय फक्त सांगून किंवा बोलून प्रस्थापित होत नसतो. त्यासाठी निःस्पृहपणे कृती करावी लागते. संविधानाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्या संविधानिक संस्थांवर, उदा. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका यांचेवर संविधानानेच सोपवली आहे, या संस्थानी सोपविलेले कार्य आणि आपापली जबाबदारी नीटपणे, प्रामाणिकपणे, संविधानिक नीतिमूल्यांनुसार पार पाडली नाही तर संविधान व लोकशाही धोक्यात येईल. हा धोका दिसू लागला आहे.**

माझे मत



ई. झेड. खोब्रागडे
9923756900

राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्यायाचे खूप सुंदर उदाहरण घालून दिले आहे. शाहू महाराज कोल्हापूर संस्थानचे राजे होते. आपल्या राज्यात त्यांनी अस्पृश्यांसाठी शाळा, हॉस्टेल, दवाखाने सुरू केलेत. शोषित, वंचिताना सामाजिक न्याय देण्याचे काम केले. म्हणून त्यांना लोकराजा म्हटले जाते. सामाजिक न्यायाचे सुंदर उदाहरण म्हणजे शाहू महाराजांनी गंगाराम कांबळे या अस्पृश्य व्यक्तीस चहाचे हॉटेल लावून दिले. ते एवढ्यावरच थांबले नाही तर ते स्वतः कांबळे यांच्या हॉटेलवर जाऊन चहा पित असत. त्यांना माहित होते की, एका अस्पृश्यास फक्त चहाचे दुकान लावून देणे पुरेसे नाही, जातीयतेमुळे दुकानात उच्चवर्णीय जाणार नाहीत आणि कांबळे यांना काहीच आर्थिक फायदा होणार नाही. म्हणून महाराज स्वतः चहाचे दुकानात जात होते. सामाजिक न्यायाचे व आर्थिक उन्नतीचे हे सर्वोत्तम उदाहरण आहे. सरकारने असे काम करून दाखविण्याची गरज आहे. विविध योजनांचा पैसा वाटणे पुरेसे नाही, तर यामुळे लाभार्थींचे जीवनात गुणात्मक फरक पडला का हे सुद्धा पाहणे आवश्यक असते. हल्ली तर विकासाचे नावाखाली लोकप्रतिधी आपली संविधानिक मूल्ये व घेतलेली शपथ विसरत चालले आहेत. यामुळे लोकशाही कमकुवत होत आहे. संविधान निष्ठा दिसत नाही. अनेक अप्रिय व अनैतिक घटना घडत आहेत. लोकप्रतिनिधीची फोडाफोडी हे एक उदाहरण आहे. सर्वसामान्य लोकांच्या विश्वासाला तडा जात आहे. संविधानिक पदावर असलेल्यांनी आदर्शवत वर्तन करणे आवश्यक आहे. चांगले बोलावे, चांगले वागावे. गैरवर्तन करणाऱ्यांचे, grave misconduct चे कोणीही समर्थन करू नये. परंतु केले जाते आणि विषय थांबविण्यासाठी कानउघडणी केली असे सांगितले जाते. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकप्रतिनिधींना पोलिस संरक्षण कशाला? सत्तेचा गर्व, कसेही वागणे, बोलणे आणि सत्ताप्राप्तीसाठी काहीही करणे हे पूर्णतः अशोभनीय आहे. भारताच्या संस्कृतीला साजेसे नाही. राजर्षी शाहू महाराजांनी 26 जुलै 1902 ला क्रांतिकारी घोषणा केली की अस्पृश्यांना, बहुजनांना 50%आरक्षण देण्यात येईल. या आरक्षण धोरणांतर्गत विविध जातींच्या कर्मचाऱ्यांशी उच्चवर्णीय अधिकाऱ्यांनी कसे वागावे, या संदर्भात महाराजांची खास आदेश... ‘कोल्हापूर इलाख्यातील रेव्हेन्यू, ज्युडिसशियल आदिकरून सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश नोकरी धरतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोण्या अधिकाऱ्यांची वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्यांनी हा हुकूम पोहचल्यापासून आठवड्याच्या आत नोटीस देऊन राजीनामा द्यावा, त्याला पेन्शन मिळणार नाही. आमची अशी इच्छा आहे की, आमच्या राज्यातील कोणत्याही इसमाला जनावराप्रमाणे न वागविता मनुष्यप्राण्याप्रमाणे वागवावे’.



यावरून लक्षात येते की शाहू महाराजांनी फक्त नोकरीत आरक्षण दिले नाही तर नोकरीत येणाऱ्या अस्पृश कर्मचाऱ्यांसोबत प्रेमाची व समतेची वागणूक उच्चवर्णीयांनी द्यावी असे बंधनकारक केले. यापुढे जाऊन, आदेशात म्हटले की ज्यांना पसंत नाही त्यांनी राजीनामा द्यावा, पेन्शन मिळणार नाही. याला म्हणता , सामाजिक न्याय. असा आदेश स्वातंत्र्यानंतर व संविधान लागू झाले तेव्हापासून आजपर्यंत 75 वर्षात असा आदेश सरकारने काढला नाही. उलट आरक्षण कसे नाकारले जाईल अशी कार्यपद्धती वापरली. त्यामुळे आरक्षणाचा अनुशेष वाढला. विशेष मोहीम राबविण्याचे आदेश काढले. परंतु इमानदारीने अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे आजही हजारो पदांचा अनुशेष आहे. प्रशासनात जातीयवाद फोफावत आहे. अपवाद वगळता, विशिष्ट अधिकाऱ्यांना सातत्याने महत्वाच्या पदांवर पोस्टिंग मिळत आहे. अनुसूचित जाती/जमातीचे अधिकाऱ्यांना संधी नाकारणे हे सामाजिक न्याय नाकारणे आहे. सामाजिक आर्थिक न्याय नाकारायचा व अनुसूचित जातींमधील काहीना काहीच मिळाले नाही म्हणून जातींचे उपवर्गीकरणचा विषय पुढे आणायचा हे सरकारी धोरण चुकीचे व अन्यायकारक आहे. कोणत्या ना कोणत्या मार्गाने, न्यायालयात प्रकरण अडकवून मागासवर्गीयांना आरक्षण नाकारणे हे काम संविधान विरोधी आहे, असे वाटायला लागते. शाहू महाराजांच्या काळात सामाजिक न्याय होता. शाहू महाराज यांचे शिक्षण, आरोग्य, पाणी, सिंचाइ अशा क्षेत्रात भरीव काम होते. खऱ्या अर्थी सुशासन होते. आता पोकळ चर्चा आहेत. जेथे शोषण, भ्रष्टाचार, पिळवणूक आहे. शोषित, वंचित दुर्लक्षित आहेत. पक्षपात, जातीयवाद, असहिष्णुता, धर्मांधता, जेथे सामाजिक आर्थिक , न्याय नाही तेथे सुशासन नसते. सामाजिक न्याय देणारे राज्यकर्ते पाहिजे. असे लोकप्रतिनिधी अपवादानेच असतील. राजर्षी शाहू महाराज सारखा राजा होणे नाही. शाहू महाराजांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेवर खूप प्रेम होते. शाहू महाराज हे डॉ. बाबासाहेब यांचे मार्गदर्शक...●●

# बौद्ध, अजा आणि अल्पसंख्यही



विद्या व्यासंग



प्राचार्य भाऊ वासनिक
9423606064

१४ आक्टोबर १९५६ ला जन्माला आलेले बौद्ध पूर्वाश्रमिचे दलित होते. हिंदू होते. हिंदूधर्म, हिंदूसंस्कृती, हिंदू पंडित, हिंदू पुढारी, हिंदू पुरोहितांनी त्यांचेवर अमानवीय अत्याचार करून शेकडो पिढ्या जनावरांसारखे जगण्यास त्यांना साध्य केले. यासाठी हिंदूधर्म ग्रंथातील पृष्ठोपृष्ठी असलेले पुरावे दिले. ऋषी-मुनी ब्राम्हणांनी कल्पनेतून कथा रचल्या. इतरांचा अज्ञान, रुढी, परंपरा यामुळे कथा धर्मग्रंथ आणि कथानायक देव, ईश्वर, परमेश्वर झाले. हे समाजाच्या मानगुटीवर बसले. ते हिंदूचे पुरावे झाले, महाराष्ट्र आणि भारत देश संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. हिंदू धर्माच्या अमानवीय अत्याचारातून अत्याचारग्रस्त समाज बाहेर काढण्यासाठी अनेक संत-महंत, हिंदू द्रठ्या पुढाऱ्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली. पण अत्याचाराच्या मूळापर्यंत कोणीही पोहोचले नाही. हिंदू-धर्म बैठकिला स्पर्श करण्यास कोणालाही सूचले नाही. किंवा कोणीही धैर्य केले नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगातील सर्वोत्तम, सर्वश्रेष्ठ विद्वानांपैकी एक, पण अस्पृश्य हिंदू होते. जगात त्यांच्या विद्वत्तेला तोड नव्हती. पण त्यांची विद्वत्ता स्वदेशात हिंदू धर्माने मान्य केली नाही. याचे कारण शोधू विद्वत्तेच्या बळावर डॉ. बाबासाहेबांनी हिंदूधर्म व हिंदूधर्म मार्तंडावर प्रखर वार केला. हिंदू धर्मातील पाखंडवाद बाहेर काढला. त्यांच्या वाणी व लेखनी तिक्ष्ण व धारदार होती. विद्वत्तेचे धनी होऊन मिरवणाऱ्यां हिंदूंना त्या धारेसमोर टिकता आले नाही. डॉ. बाबासाहेबांनी हिंदू धर्मातील सत्याचे शोधन केले. दलितावरील अन्याय, वर्ण-जाती द्वेष कपटी ब्राम्हणवादाचे षंडयंत्र असल्याचे जगासमोर आणले. हिंदूधर्माने शुद्राहून नीच पाचवा वर्ण अस्पृशांचा केल्याचे शोधले. हिंदू धर्मातील हा दोष पुसून काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंदोलने, चळवळी केल्या. हिंदू द्रष्टे म्हणवणाऱ्यांना जाग आली नाही. १४ ऑक्टोबर १९५६ ला सात लक्ष जनसमुदायाने धर्मांतरण केले. नागपूरच्या दीक्षाभूमीवर गटारातून शुद्र, अस्पृश्यांना मुक्ती मिळाली. कुपमंडूक मानसिकता बदलली. धम्मस्वातंत्र्याने विचारात, व्यवहारात विस्तीर्णता, विशालता आली. समाजाने युक्तीचा श्वास घेतला. धर्मांतराने जीवनाच्या आशा पल्लवित झाल्या. दलित शब्दावर उच्च न्यायालयाने बंदी आणली. शासनाने जाती अनुसूचितबद्द केल्या. शुद्र वर्णातील अस्पृश्याच्या अनुसूचित जाती (अ.जा.) प्रवर्गात महाराष्ट्रात अती नीच शोषित, पीडित, दबलेला, पिचलेला त्याज्य समाज ५९ उपजातीत असून देशात ४६२५ उपजातीआहेत. महाराष्ट्रातील ४३७२० खेड्यात ५९ उपजाती विखुरल्या आहेत. २०११च्या जनगणने नुसार महाराष्ट्रात अ.जा.जनसंख्येने ११.८% तर देशात १६.६% आहेत. १९५६ नंतर धर्मांतरीत बौद्ध अ.जा.प्रवर्गातील आहेत. त्यांना शासनाच्या अजाच्या सवलती सुरू आहेत. १९५६ नंतरचे धर्मांतरीत बौद्ध संख्येने अल्प आहेत. हा ख्रिश्चन, मुस्लिम धार्मिक अल्प संख्याकासारखा आधी विकास झालेला समाज गट नाही. धर्मांतरीत बौद्धांचा सामाजिक, आर्थिक, नोकरीपेशा, उद्योग क्षेत्रातील दर्ज्यात फारसा फरक पडला नाही. बौद्ध धर्मांतराने समाजाची स्वबळावर उभे होण्याची व शासनाच्या संधीचा लाभ घेण्याची समज वाढली. लोकसंख्येने धर्मांतरीत बौद्ध अल्पसंख्य आहेत. धर्मांतरीत बौद्धांना राष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रवाहात येण्यासाठी आरक्षण हे एक साधन आहे. होऊ घातलेल्या जनगणनेत धर्मांतराने बौद्ध झालेल्यांनी अजा जातीचा व बौद्ध असल्याचा उल्लेख करावा. असा केलेला उल्लेख कायद्यांतर्गत नियमानुसार राहील. या आधीच्या पिढीने फार सोसले. या पिढीला आयते मिळाले. या पिढीने पुढच्या पिढीची जबाबदारी घ्यावी. स्वयं विचार प्रवृत्त व्हावे. संविधानातील आरक्षणाच्या, परिवर्तनाच्या कलमा समजून घ्याव्या. २०११ नंतर २५ वर्षानी जनगणनेने जबाबदारी येत आहे. विवेक जागृत असावा. जबाबदारीची जाणीव ठेवावी. प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिश्रमाची आठवण विसरू नये.●●

# दिनचर्या (Daily Routine)



आरोग्यम् सुखसंपदा



डॉ. सूर्यकांता पाटील
मो. 9923338047

स्वस्थ व आरोग्यदायी जीवनशैली जगण्यासाठी सर्वप्रथम दिनचर्या, रात्रीचर्या, ऋतुचर्या व आहार विहार यांचे योग्य पालन करणे आवश्यक आहे.

**दिनचर्या :** सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत स्वस्थ व आरोग्य सुदृढ राहण्यासाठी दररोज केलेले कार्य म्हणजे दिनचर्या होय.

**ब्रह्म मुहूर्त (सकाळी लवकर उठणे) :** रात्रीची संपूर्ण व शांत झोप झाल्यानंतर सूर्योदयापूर्वी एक ते दीड तास अगोदर उठणे यालाच ब्राह्म मुहूर्त म्हणतात. म्हणजे सकाळी ४ ते ४.३० वाजता उठणे. या वेळेत सकाळचे वातावरण शांत असते. झोप झाल्यामुळे शरीर व मन प्रसन्न असते. ही वेळ विद्यार्थ्यांसाठी अभ्यास करण्यासाठी खूप उपयुक्त आहे. तसेच इतर व्यक्तींसाठी चिंतन, मनन, ध्यान धारणा व योगाभ्यास, प्राणायाम करण्यासाठी उपयुक्त आहे. ब्राह्म मुहूर्तावर शरीर आणि निसर्ग यामध्ये सत्वगुणाचे आधिक्य असते. त्यामुळे मन, इंद्रिय आणि बुद्धी प्रसन्न असतात. वातावरण शांत असते आणि आपल्याला शुद्ध ऑक्सिजन मिळतो. तसेच आयुर्वेदानुसार ब्राह्म मुहूर्ताचा काळ हा वातदोषाचा काळ असतो यामुळे मला निस्सारणं सहज होण्यास मदत होते.

**उषःपान :** सकाळी उठल्याबरोबर एक ते दोन ग्लास कोमट पाणी पिल्यामुळे मल वेग येण्यास मदत होते. म्हणूनच आजकाल बरेचसे व्यक्ती सकाळी उठल्याबरोबर कोमट जलासोबत लिंबू पाणी किंवा मध पाणी पितात. यामुळे शरीरामध्ये ऊर्जा येते. तसेच शरीरातील अतिरिक्त चरबी नष्ट होते. ज्या व्यक्तींना मलबद्धता किंवा पोट साफ न होणे याचा त्रास असल्यास त्यांनी दररोज सकाळी उठल्याबरोबर कोमट पाणी प्यावे

**मलउत्सर्जन :** सकाळी उठल्याबरोबर मल व मुत्र यांचे विसर्जन करावे. त्यामुळे शरीर स्वस्थ राहते. पोट साफ झाल्यामुळे शरीरामध्ये हलकेपणा जाणवतो व मन प्रसन्न होते. यामुळे मलबद्धता आम्लपित्त, पोट जड वाटणे यासारखे विकार होत नाही.

**आचमन :** मल विसर्जनानंतर हात पाय व तोंड स्वच्छ धुवावे. यामुळे शरीरशुद्धी व मुखशुद्धी होते. दंतधावन मल विसर्जनानंतर दात घासावे. यासाठी कटू, तीक्त कशाया व मधुर रस असलेल्या विविध वनस्पतीचे जसे की कडुनिंब, बाभूळ, अर्जुन, करंज यांच्या काडीने दात स्वच्छ करावे. किंवा आयुर्वेदिक दंतमंजनाचा दात घासण्यासाठी वापर करावा. दंत धावण केल्यामुळे मुखाची दुर्गंधी नष्ट होते तसेच तोंडाला चव येते व मन प्रसन्न होते. आजकाल दात घासण्यासाठी ब्रशचा उपयोग करतात. अशा वेळी सॉफ्ट ब्रश यांचा वापर करावा. ज्यामुळे हिरड्याला नुकसान पोहोचत नाही. रोज सकाळी उठल्यावर व रात्री झोपण्यापूर्वी दात स्वच्छ करावे त्यामुळे दाताचे आरोग्य व मुखाचे आरोग्य चांगले राहते.

**जिव्हानिर्लेखन ( Toung cleaning) :** दात घासल्यानंतर जीभेची स्वच्छता करावी यासाठी आजकाल toung क्लीनरचा उपयोग करतात. जिभेची स्वच्छता झाल्यामुळे मुखदुर्गंधी, श्वास दुर्गंधी नष्ट होते व तोंडाला चव येते. आपल्या शरीरामध्ये जीभ हे एक ज्ञानेंद्रिय आहे. तसेच जिभेवर थर साचले असल्यास त्यावरून विविध आजाराचे निदान होण्यास मदत होते. आपली जीभ स्वच्छ असणे हे निरोगी असण्याचे एक लक्षण आहे. त्यामुळे जिभेची स्वच्छता करणे आवश्यक आहे.

**मुखप्रक्षालन व हस्तपाद प्रक्षालन :** नखे व केस कापल्यानंतर, दाढी केल्यानंतर, डोळे, कान, नाक स्वच्छ केल्यानंतर, बाहेरून आल्यावर, जेवणापूर्वी, झोपेतून उठल्यावर, प्रत्येकवेळी हात, पाय व चेहरा स्वच्छ पाण्याने धुवावा. त्यामुळे शरीर व मन ताजेतवाने होते व थकवा नाहीसा होतो. आधुनिक काळामध्ये बाहेरून आल्यानंतर शॉवर घेण्याची पद्धत आहे. आदर्शअवलोकन आरशासमोर उभे राहून स्वतःचे अवलोकन करणे म्हणजेच आदर्शअवलोकन होय. त्यामुळे आपल्याला स्वतःच्या आरोग्याची शरीर स्वच्छतेची व आनंदाची अनुभूती होते.

**नखे व केस कर्तन :** नखे व केस नियमित कापावे. साधारणतः दर पाच दिवसांनी नख कापावे तसेच पुरुषांनी नियमित दाढी व मिशा कापाव्या. म्हणजेच shaving करावे. यामुळे चेहरा सुंदर दिसतो व कुठल्याही प्रकारचे चेहऱ्याचे विकार होत नाही. नस्य म्हणजे नाकामध्ये नियमित औषधीयुक्त तेल घालणे. यामुळे सर्दी, डोकेदुखी व मानेचे विकार दूर होतात.

**अंजन :** डोळ्यामध्ये औषधीयुक्त काजळ लावणे यामुळे डोळ्याचे सौंदर्य वाढण्यास मदत होते. तसेच डोळे सुंदर दिसतात व डोळ्याचे विकार होत नाही. गंडूष व कवल तोंडामध्ये औषधीयुक्त द्रव काही काळ धरून ठेवणे याला गंडूश म्हणतात. कवल यामध्ये औषधीयुक्त द्रव तोंडामध्ये घेऊन इकडे तिकडे फिरवत यालाच कवल म्हणतात. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास औषधीयुक्त पाण्याने गुळण्या करणे रोजच्या व्यवहारात आपण सर्दी खोकला झाल्यास मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करतो किंवा मुख रोगामध्ये दाताच्या विकारांमध्ये औषधीयुक्त पाण्याने गुळण्या करतो. गण्डूश व कवल केल्यामुळे दंतरोग मुख रोग हे आजार होत नाही व मुखशुद्धी होते.

**कर्णपुरण :** नियमित कानामध्ये औषधीयुक्त तेल टाकल्यास कर्णरोग, कान दुखणे कर्णबाधिर्य यासारख्या आजारांपासून दूर राहता येते.

**अभ्यंग :** संपूर्ण शरीरावर स्निग्ध मृदु सुगंधी द्रव्ययुक्त तेलाने मालिश करणे यालाच अभंग असे म्हणतात. नियमित अभ्यंग केल्याने दीर्घायु प्राप्त होते तसेच शरीर कोमल व तेज युक्त होते. शरीरावर सुरकुत्या पडत नाही. शरीर सुदृढ व शरीराचे कार्य व्यवस्थित होण्यास मदत होते. थकवा नाहीसा होतो. अकाली येणाऱ्या वृद्धत्वापासून रक्षण होते.

**शिरोअभ्यंग :** डोक्याला औषधीयुक्त तेलाने मालिश करणे याला शिरोअभ्यंग म्हणतात. यासाठी ऋतूनुसार सरसोचे तेल, तिळाचे तेल, नारियल तेल यांचा उपयोग केला जातो. यामुळे डोकेदुखीचा त्रास होत नाही. तसेच केस मुलायम काळे व घनदाट होतात. केस पांढरे होण्यापासून बचाव होतो. झोप न येणे यासारख्या समस्या दूर होतात.

**पादाअभ्यंग :** औषधीयुक्त तेलाने तळपायाची मालिश करणे याला पादाअभ्यंग म्हणतात. यामुळे शांत झोप लागते व थकवा दूर होतो. उदवर्तन म्हणजे शरीराला उटणे लावणे. औषधीयुक्त सुगंधित द्रव्यापासून केलेल्या उटण्यापासून शरीराला मालिश करणे म्हणजे उदवर्तन होय. यामुळे त्वचा कोमल होते व त्वचा विकार होत नाही आजकाल चेहऱ्यावर व शरीरावर निरनिराळ्या सुगंधित औषधीयुक्त चूर्णाचे लेप याचा सौंदर्यप्रसाधन म्हणून उपयोग केला जातो. आजकालच्या आधुनिक युगामध्ये बॉडी स्पा, हेअर स्पा, बॉडी मसाज, फेशियल हे सर्व प्रकार म्हणजे आयुर्वेदामध्ये सांगितलेले उद वर्तन व अभ्यंग याचेच आधुनिक प्रकार होय. यासाठी आपण कितीतरी पैसा खर्च करतो व पार्लरमध्ये जाऊन या सगळ्या क्रिया करून घेतो. क्रमशः ■■

30 June 2026 page 03-1_Layout 1 6/29/2026 5:31 PM Page 1



# आसाममधील बौद्ध धम्माच्या पाऊलखुणा

आसाम राज्यात बौद्ध धर्माचा प्रचार, प्रसार करण्याचे मुख्य काम सम्राट अशोक यांचे शिष्य थेर धितिका यांनी ई. स. पूर्व ३ ऱ्या शतकात केलेले आहे. थेर धितिका हे महान बौद्ध भिक्खु होते. त्यांनी मध्य व उत्तर भारतात बौद्ध धर्म वाढीकरिता खूप मेहनत घेतली आहे. सम्राट अशोक यांनी आसाममध्ये काही स्तूप, विहार यांची निर्मिती केलेली आहे. ई. स. २ रे शतकमध्ये प्रख्यात बौद्ध भिक्खु नागार्जुन (शून्य वादाचे जनक) यांनी या भागात एक चैत्यगृह उभारले. पुढे ४ थ्या शतकात त्यावर अन्य धर्मीय लोकांनी कब्जा केला, आज ते चैत्यगृह हिंदूंचे प्रसिद्ध मंदिर म्हणून प्रचलित आहे. ७ व्या शतकात काही बुद्ध मूर्ती, विहार यांची निर्मिती झाली. त्याचे अवशेष अलीकड उत्खननात मिळाले असल्याचे दिसत आहे. हाजो येथील 'हायग्रिव माधव मंदिर' हे ७ व्या शतकात बांधले गेले आहे. या मंदिराची स्थापत्यकला, शिल्पकला पाहता ते बुद्धविहार असल्याचे दिसते. नेपाळ, भूतान, तिबेट, चीन या देशातील जनता या मंदिरास बुद्धविहार म्हणूनच मानतात. तिबेट येथील जनतेचे असे मानणे आहे की, प्रख्यात बौद्ध भिक्खु सिद्ध पद्मनाभ यांचे निर्वाण या जागेवर झाले असून त्या घटनेची आठवण म्हणून इथे ही वास्तू बांधण्यात आली. त्यात एक बुद्ध मूर्ती बसविण्यात आली. ते हिंदू मंदिर नसून बुद्ध विहार आहे. आज या मंदिरात हिंदू व बौद्ध लोक मोठ्या भक्तीभावाने पूजा करतात. आसाममध्ये आज 'ताई' वांशिक गट जो आहे तो चीन मधील युनान प्रांतातून, म्यानमार सिमेपासून ५ व्या, ६ व्या शतकात टप्याटप्प्याने आलेला आहे. ताई वांशिक गट बुद्ध काळापासून बौद्ध धर्माचे पालन करत आलेला आहे. असे या वंशाच्या अभ्यासकांचे मत आहे. ताई या वांशिक गटात प्रामुख्याने ताई फाके, ताई अशेन, ताई खांपोती, ताई तुरंग, ताई सिंगफो, ताई अहोम या व अन्य काही जमातींचा समावेश होतो. हा वांशिक गट आग्नेय आशिया व दक्षिण आशिया खंडात पसरलेला आहे. त्याचे मूळ चीनमधील युनानमध्ये आहे. हा समूह म्यानमार देशाशी संबंध ठेऊन आहे. ताई शब्दाचा अर्थमुक्त, स्वतंत्र, आसक्ती विरहित असा होतो. या समूहातील लोक सुरवातीस 'हिनयान' म्हणून ओळखले जात होते. त्यानंतर थेरवादी म्हणून ओळखले जाऊ लागले. १८१७ ते १८२६ मध्ये म्यानमार देशाने आसामवर तीन वेळेस आक्रमण केले, म्यानमार मधील सैनिकांचे १८२१ ते १८२५ पर्यंत या भागावर पूर्ण नियंत्रण होते. म्यानमार मधील काही ताई अहोम लोक इथे येऊन राहू लागले तेंव्हा हा समूह म्यानमार मधील लोकांप्रमाणे



राहू लागला. आज त्यांच्या व्यवहारात हिनयान, महायान, थेरवाद या तत्त्वांचा समावेश आहे. ताई वांशिक गटाबरोबरच चकमा, चित्तगोंग बरूआ या जाती सुद्धा बौद्ध म्हणून ओळखल्या जातात. काही जमातीमध्ये अजूनही बौद्ध परंपरेप्रमाणे सण साजरे केले जातात. ई. स. ६४० मध्ये प्रख्यात चिनी प्रवासी ह्यु यान स्यांग हे आसाम प्रदेशात आले तेंव्हा तिथे राजा भास्कर बर्मन याचे राज्य होते. हा राजा बौद्ध धर्मीय नव्हता. मात्र त्याने स्यांग यांना राजाश्रय दिला. कनौज येथे बौद्ध राजा हर्षवर्धन याने जी धर्मपरिषद आयोजित केली होती त्या परिषदेला राजा बर्मन स्यांग यांना घेऊन गेल्याचे दाखले मिळतात. या कालावधीत तीनसुकिया, दिब्रुगड, नामफके, हाजो, नाहर कटिया, मार्गारिटा, टीटाबोर, सिलोनिया, गोलपारा, सूर्य पहाड, चालपोथर, जोरहार, गोलाघाट आदी भागात बुद्ध विहारे, चैत्यगृहे, स्तुप आदी बौद्ध वास्तू काही प्रमाणात होत्या. या संदर्भाने स्यांग यांच्या प्रवास वर्णनात आसाममधील बौद्ध इतिहास, तत्कालीन अवस्था या विषयी विस्तृत माहिती मिळत नाही. आसाममध्ये एकही बौद्ध राजा होऊन गेल्याचे इतिहासात दिसत नाही. आग्नेय आशियातून विविध जमाती आसाममध्ये आल्या. या जमाती इथे स्थिरस्थावर झाल्या. याच दरम्यान म्यानमार मधूनच राजपुत्र चाऊ लूंग सुकाफा याच्या नेतृत्वाखाली अहोम वंशातील / जातीतील लोक आसाममध्ये आले. ते म्यानमार मधील 'शान' जातीचे होते. ताई वंश समूहात अहोम, शान यांचाही समावेश आहे. हे सर्व चीनमधील युनान या एकाच प्रांतातील मुळ रहिवासी आहेत. शान जातीचे लोक बऱ्याच प्रमाणात बौद्ध धर्माचे पालन करत असले तरी ते स्वतःला अहोम धर्माचे मानतात. त्यांच्या धर्मग्रंथात बौद्ध धर्मातील 'जातक कथा' या ग्रंथाचा सुद्धा सहभाग आहे. ताई समूहातील अन्य लोक मात्र बौद्ध म्हणवून घेतात. चाऊ लुंग सुकाफाने अहोम साम्राज्य स्थापन केले. या वंशाने आसामवर सन १२२८ ते १८२६ (सुमारे ६०० वर्षे) पर्यंत राज्य केले. ओहम जातीचे राजे हे स्वतःला बौद्ध धर्मीय मानत नसले तरी ते बौद्ध धर्माचा द्वेष करणारे नव्हते. त्यांनी ६०० वर्षात या भागात बौद्ध धर्माचा प्रचार, प्रसार केल्याचे, बौद्ध स्थळे उभारल्याचे, बौद्ध धर्माला राजाश्रय दिल्याचे ऐतिहासिक दाखले मिळत नाहीत. ते इथल्या संस्कृतीशी समरस होऊन गेले. त्यांनी त्यांचे चम - फा, शेंग - मुंग हे देव सुद्धा बाजूला ठेवले. मात्र या काळात 'बुरुंजी' हस्तलिखिते लिहिली गेली, जी आसाम मधील बौद्ध धर्मियांचे स्थान, बौद्धांची संस्कृती, आसामचा मध्ययुगीन इतिहास दर्शविण्यासाठी उपयुक्त ठरली. १७१५ मध्ये अहोम राजा सिबसिंग याने हिंदू धर्माचा स्वीकार केला. या लोकांनी १९३१ च्या जनगणनेत हिंदू म्हणून नोंद केली. आज आसाम मधील सर्व अहोम हे धर्माने हिंदू आहेत. ताई वंश गटातील एक मोठा समाज की जो राज्यकर्ता समाज होता तो हिंदू झाल्याने आसाम मधील बौद्ध धर्म अजूनच दुर्लक्षित झाला. आसाममध्ये ७ व्या शतकानंतर १३ व्या शतकात ताई समुहा कडून बौद्ध वास्तूंची निर्मिती होऊ लागली. त्यातही १९ व्या शतकात त्याने अधिक गती घेतली. यात तिबेटी प्यागोडे सुद्धा आहेत. या कालखंडात 'नाम फाके बुद्ध विहार' हे अतिशय अप्रतिम स्वरूपात बांधले गेले. हे विहार १८५० मध्ये पूर्ण झाले. हे विहार दीब्रुगड जिल्ह्यातील नाहर कटीया या शहाराजवळ बुंग नदीच्या काठावर आहे. या विहारास ताई फाके बुद्ध विहार म्हणूनही संबोधले जाते. ताई फाके समाजाने या बिहारची निर्मिती केली आहे. अलीकडच्या काळातील सर्वात जुने प्रसिद्ध विहार म्हणून याची ओळख आहे. या विहारात भगवान गौतम बुद्ध यांची सोन्याची अतिशय सुबक मूर्ती आहे. विहाराचे बांधकाम व रचना आकर्षक आहे. या विहारात प्राचीन हस्तलिखिते, प्राचीन बौद्ध ग्रंथ, प्राचीन ऐतिहासिक चित्रे जतन करून ठेवली आहेत. इथे स्वतंत्र ग्रंथ दालन आहे. या विहाराच्या परिसरात एक तलाव आहे, एक उंच अशोक स्तंभ आहे. नाम फाके गावात सुमारे २५० ताई फाके कुटुंब राहतात. आसाम मधील बौद्ध संस्कृती टिकवून ठेवण्यात या समाजाचे मोठे योगदान आहे. तीनसुकिया जिल्ह्यातील लोडो गावाजवळील मोगलांग गावातील 'मोगलांग खामती बौद्ध मठ' अतिशय रमणीय परिसरात उभारण्यात आला आहे. म्यानमार येथील उ गुनावांथा महाथेरो हे १९५० ला वयाच्या २७ व्या वर्षी या भागात आले. गुनावांथा यांचे मुळ नाव मोंग ची येन होते. त्यांनी १८ व्या वर्षी भिक्खु म्हणून दीक्षा घेतली. त्यांचे कार्य पाहता त्यांना 'अनाथ पिता' म्हणून संबोधले जाते. त्यांनीच या जगप्रसिद्ध मठाची स्थापना केली. हे एक आंतरराष्ट्रीय ध्यान केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. हे विहार भंते बाबा मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. पटकाई पर्वत व चहाचे हिरवेगार मळे यामुळे हे स्थळ अतिशय निसर्गरम्य वाटते. सिबासागर(शिवसागर) जिल्ह्यातील चालपोथर येथील बुद्ध विहार प्रेक्षणीय आहे. तिथे १४ एप्रिल रोजी 'पोई संकेन' हा त्यांचा परंपरागत सण साजरा केला जातो. हा सण सर्वात मोठा सण असतो. हा दिवस ताई वंश गटाचा वर्षाचा पहिला दिवस असतो. या दिवशी विहारातील बुद्धमूर्ती बाहेर आणून तिची विधिवत पूजा करतात. हा सण तीन दिवस साजरा केला जातो. आसाममध्ये बरीच बौद्ध स्थळे असून ती प्रामुख्याने ताई समूहाची आहेत. अहोम राजांनी त्यांच्या ६०० वर्षांच्या सत्ताकाळात बौद्ध धर्माचा विकास केला असता तर कदाचित भारतातील सर्वाधिक बौद्ध स्थळांचे राज्य म्हणून, बौद्ध लोकसंख्येत सर्वात मोठे राज्य म्हणून आसाम राज्याचा इतिहास लिहिला गेला असता. त्यांच्या नाकर्तेपणामुळे त्यांचाच अहोम धर्म आसाम मधून हद्दपार झाला. आज तिथे २०११ च्या जनगणणे नुसार ५० टक्के हिंदू, ३० टक्के मुस्लिम असून केवळ ०.०१ टक्के लोक बौद्ध आहेत.●●



जयसिंग वाघ
मो.9881928881

## संस्कार वर्ग

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

शाळेत शिकत असताना आमचे गुरुजी सकाळी प्रार्थनेच्या वेळी संस्कार वर्ग घ्यायचे. त्यांनी त्या वेळी सांगितलेल्या गोष्टींच गांभीर्य कळलं नाही. आज त्यांचे विचार किती मौलिक होते याची वेळोवेळी प्रचिती येते. एकदा' माणसाने कसे बोलावे' या विषयावर ते म्हणाले होते, तुम्ही कितीही पदव्या घ्या, कोणत्याही मोठ्या पदावर जा, परंतु जर तुम्हाला काय बोलावे ? कसे बोलावे ? कधी बोलावे ? याची समज नसेल तर तुम्ही खरे अडाणी आहात. पाणी जर त्याची मर्यादा सोडत असेल तर विनाश होतो. पण वाणीने मर्यादा सोडल्यास सत्यानाश अटळ आहे. आपले नातेसंबंध जर घट्ट ठेवायचे असतील, तर त्यामध्ये शब्द कमी असले तरी चालतील; पण भरपूर समजदारी असणे आवश्यक आहे. ज्यांना आयुष्यात यशस्वी व्हावे, असे वाटते त्याने हे लक्षात ठेवावे,' एकवेळ पाय घसरला तरी चालेल पण जिभ घसरता कामा नये.' ज्याला बोलावसं वाटते त्याने ऐकायलाही शिकले पाहिजे. आपल्या वाणीला वीणा बनवा. तेव्हाच आयुष्याचे मधुर संगीत अनुभवता येईल. पण वाणी ही बाणासारखी असेल तर महाभारत हे घडणारच. जेथे गप्प राहणे आवश्यक आहे तेथे मुळीच बोलायचं नसते. जेथे बोलायलाच हवे तेथे मौन बाळगू नका. नाही तर त्याची किंमत ही दोन्ही वेळेस चुकवावी लागेल. जर कोणीही तुमचा शत्रू नसेल तर हे निश्चित आहे, जेथे बोलायला हवे होते, तेथेही तुम्ही गप्प बसले. सर्व काही माहीत असूनही जर तुम्ही चुकीच्या गोष्टीला चूक म्हणत नसाल, तर तुम्ही तुमच्या हक्काची लढाई कधीही लढू शकणार नाही. शेवटचे सांगतो माणसाने काय बोलावे, या पेक्षा काय बोलू नये यालाच महत्त्व आहे. गुरुजींची प्रत्येक गोष्ट आज आठवत होती. मनात विचार आला आज गुरुजी नाहीत म्हणून कुणाचीही कदर करायची तर ती त्यांच्या समोरच करा. नंतर केलेली कदर ही कदर नसून तो पश्चात्ताप असतो. गुरुजी ! मिस्यू ! ●●

# बुद्धकालीन निष्ठावान अन् समर्पित गृहस्थ

नकुलपिता आणि नकुलमाता हे बुद्धकालीन अतिशय प्रसिद्ध गृहस्थ जोडपे होते. दोघेही बुद्धांचे परम भक्त होते. बुद्धांनी त्यांच्या आदर्श संसाराचे कौतुक केले होते. जर पती-पत्नीला या जन्मातच नव्हे, तर पुढील जन्मातही एकत्र राहायचे असेल, तर त्यांनी श्रद्धा, शील (सदाचरण), त्याग आणि प्रज्ञा अंगीकारली पाहिजे, हा त्यांचा बहुमोल उपदेश आजही धम्म प्रचारक जोडप्यांसाठी आदर्श मानला जातो. सुमारे 2500 वर्षांपूर्वी अर्थात भगवान बुद्धांच्या काळात नकुल माता नावाची एक अत्यंत ज्ञानवंत आणि आदर्श गृहिणी होत्या. तिचे खरे नाव अज्ञात आहे, परंतु तिच्या मुलाचे नाव नकुल होते. म्हणून पाली साहित्यात तिला नकुल माता (नकुलाची आई) म्हणून संबोधले गेले. नकुल माता आणि त्यांचे पती (ज्यांना नकुल पिता म्हटले जाते) हे वर्तमान उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या सीमेवर असलेल्या भार्ग प्रांताचे रहिवासी होते. हा चुनारचा डोंगर आहे. विमानातून पाहिल्यास येथील दृश्य कोळ्यासारखे दिसतात. या पुण्यभूमीवर भगवंतांनी मज्झिम निकायातील 15, 50 आणि 85 या सुत्तांचा बहुमोल उपदेश केला. त्यांनी नकुलपित्त सुत्ताचाही उपदेश केला.

उदयनाचा मुलगा राजकुमार बोधीने सुसुमारगिरीवर कोकणदा महाल बांधला होता. त्याने भगवंताला या महालात आमंत्रित केले होते. चुनार जंक्शन स्टेशन मुगलसराई स्टेशननंतर आहे आणि ते मुगलसराई आणि मिर्झापूरच्यामध्ये वसलेले आहे. नकुल पिता आणि नकुल माता हे दोघे पती-पत्नी बुद्धांचे अत्यंत जिवलग समर्पित भक्त होते. अनेक जन्मांपासून ते बुद्धांचे आई-वडील होते. स्वतः बुद्धांनी नकुल माता आणि नकुल पिता या जोडीला आपल्या अनुयायांमधील सर्वात जवळचे आणि समर्पित जोडपे म्हणून घोषित केले होते. या जोडप्याने बुद्धांकडे असा वर मागितला होता की, त्यांना त्यांच्या सर्व जन्मात एकमेकांचाच सहवास लाभावा. 'नकुलपित्त सुत्त' त्यांच्या जीवनातला एक हृदयस्पर्शी प्रसंग बौद्ध साहित्याच्या 'अंगुत्तरनिकाय' आणि 'संयुक्तनिकाय' या



ग्रंथात वाचावयास मिळतो. एकदा नकुल पिता गंभीर आजारी पडले आणि मृत्यूची सारखी चिंता करीत होते तेव्हा नकुल मातेने आपल्या अद्भुत बुद्धिमत्ता, संयम आणि आध्यात्मिक ज्ञानाने त्यांचे सांत्वन केले आणि त्यांची भीती दूर केली. जेव्हा नकुल पिता बरे झाले तेव्हा त्यांची पदकमले बुद्धांकडे हळुवारपणे वळली. बुद्धाजवळ त्यांनी आपल्या पत्नीच्या बुद्धिमत्तेचे गुणगान केले. तेव्हा बुद्धांनी त्यांना आणि त्यांच्या पत्नीला कारुणिक उपदेश केला की, 'जर पती-पत्नींमध्ये समान श्रद्धा, सद्गुण, औदार्य आणि बुद्धिमत्ता असेल, तर ते केवळ या जीवनातच नव्हे, तर पुढील जीवनातही एकत्र राहू शकतात.' भगवान बुद्धांच्या वचनाने आनंदित आणि प्रफुल्लित झालेला गृहस्थ नकुलपिता आपल्या आसनावरून उठला; त्याने भगवंतांना त्रिवार वंदन केले आणि पूज्यनीय भन्ते सारिपुत्तांकडे गेला. सारिपुत्तांना वंदन करून तो एका बाजूला बसला. सारिपुत्त त्यांना म्हणाले, 'गृहस्था नकुलपिता, तुझी इंद्रिये शांत आहेत आणि तुझा चेहरा प्रसन्न आणि तेजस्वी दिसत आहे. आज तुला भगवंतांच्या सान्निध्यात धम्म-उपदेश ऐकायला मिळाला का? त्यावर नकुलपिता म्हणतो, का नाही भंते? आताच मला भगवंतांनी आपल्या धम्म-उपदेशाच्या अमृताने अभिसिंचित केले आहे. गृहस्था, भगवंतांनी तुला कोणत्या प्रकारच्या धम्म-उपदेशाच्या अमृताने अभिसिंचित केले? सारिपुत्र म्हणाले, भन्ते भगवान, मी भगवंतांकडे गेलो होतो... (गृहस्थ नकुलपिता बुद्धांशी झालेला आपला संपूर्ण संवाद पुन्हा सांगतो.) भन्ते, अशा धम्म-उपदेशाच्या अमृतानेच भगवंतांनी मला अभिसिंचित केले. गृहस्था, तुला असे सुचले नाही का भगवंतांना आणखी प्रश्न विचारावा - की एखादी व्यक्ती शरीराने आणि मनाने कशी पीडित असते आणि एखादी व्यक्ती शरीराने पीडित असूनही मनाने कशी पीडित नसते? भन्ते या विधानाचा अर्थ पूजनीय सारिपुत्तांकडून जाणून घेण्यासाठीच आम्ही दूरवरून आलो असतो. पूजनीय सारिपुत्तांनी या विधानाचा अर्थ स्पष्ट करून सांगितला तर ते खरोखरच उत्तम ठरेल. तर मग ऐक आणि लक्षपूर्वक लक्ष दे, गृहस्था, मी सांगतो. हो भन्ते, गृहस्थ नकुलपिताने उत्तर दिले. पूज्यनीय सारिपुत्त म्हणाले. 'गृहस्था, एखादी व्यक्ती शरीराने आणि मनाने कशी पीडित असते? येथे, गृहस्था, जो अज्ञानी सामान्य जन आहे, जो आर्य (श्रेष्ठ) पुरुषांना पाहत नाही आणि त्यांच्या धम्मात अकुशल व असंयमित आहे,

जो श्रेष्ठ व्यक्तींना पाहत नाही आणि त्यांच्या धम्मात अकुशल व असंयमित आहे, तो रूपालाच 'मी' मानतो किंवा 'मी' रूपाचा स्वामी आहे असे मानतो किंवा 'मी' रूपाच्या आत आहे असे मानतो किंवा रूप 'मी'च्या आत आहे असे मानतो. तो 'मी म्हणजे रूप आहे' आणि 'रूप माझे आहे' अशा कल्पनांच्या अधीन होऊन जगतो. बौद्ध धम्मात नकुल मातेला एक आदर्श पत्नी, एक धाडसी स्त्री आणि एक ज्ञानी भक्त म्हणून अत्यंत आदराचे स्थान आहे. 'पतिव्रता आणि प्रिय पत्नी' या विशेषणाने नकुल मातेला बुद्धांनी गौरविले होते एवढेच नव्हे तर आदर्श वैवाहिक जीवनासाठी आणि बुद्धांवरील अढळ श्रद्धेपोटी या गृहस्थाधर्मी पती-पत्नीला ओळखले जाते. जर पती-पत्नीला या जन्मातच नव्हे, तर पुढील जन्मातही एकत्र राहायचे असेल, तर त्यांनी श्रद्धा, शील (सदाचरण), त्याग आणि प्रज्ञा अंगीकारली पाहिजे, हा त्यांचा बहुमोल उपदेश आजही धम्म प्रचारक जोडप्यांसाठी आदर्श मानला जातो. याशिवाय तथागतांच्या काळातील धम्मकार्यात अनाथपिंडिक (सुदत्त) आणि त्यांची पत्नी पुञ्ञलक्खणा (पुण्यलक्षणा) हे देखील अतिशय दानशूर आणि प्रसिद्ध जोडपे होते, ज्यांनी 'जेतवन' महाविहार बांधून बुद्धांना अर्पण केला होता.●●



मिलिंद मानकर
मो. 8177866397

# पेपर लीक, NEET ठीक? परीक्षा रद्द, व्यवस्था कुंद!

NEET ची परीक्षा असल्याने विद्यार्थी मोठ्या निर्धाराने दोन तीन वर्षे, किंबहुना त्याही आधी तयारीला लागलेले असतात. लाखो रुपयाची पदरमोड करून विशेष शिकवणी वर्ग, प्रश्नसंचांचा बारकाईने निरीक्षण करून सोडण्याचा वारंवार सराव अशा जय्यत तयारीनिशी परीक्षेच्या प्रतिक्षेत असतात. डॉक्टर होण्याचे स्वप्न वास्तवात उतरवण्याची ती एक संधी असते; आणि अशा अंतिम क्षणाला अचानक कानावर आदळणाऱ्या पेपर लीक, परीक्षा रद्द अशा बातम्या ऐकून विद्यार्थ्यांना किती भयंकर वेदना होत असतात. हे पेपरफुटी प्रकरणानंतर समाजाने बघितले आहे. त्याबद्दलचा संताप व्यक्त होत असतानाच विद्यार्थी - पालक वर्ग अक्षरशः हताश होऊन व्यवस्थेकडे नजरा खिळवून बसलेला दिसत आहे. ही भयंकर अगतिकता का? याचे उत्तर समाजव्यवस्थेत सापडेल. पेपर लीक प्रकरण उघडकीस आल्याने देशभर हाहाकार माजला आहे. या प्रकरणात एकामागून एक तथाकथित बुद्धीवादी ठेकेदारांची नावे समोर येऊन धरपकड सुरू होऊन उजव्या विचारसरणीच्या धुरीणांशी साटेलोटे असणाऱ्यांची भ्रष्ट मनोवृत्ती समोर येत आहे. पेपर लिक प्रकरण आणि गतकाळी गाजलेले आंबेपुराण यांचे हितसंबंध चर्चेत येऊ लागले. या प्रकरणात मनीषा मांढरे अडकल्या असून निवेदिता एकबोटे प्राचार्य असलेल्या शिक्षण संस्थेत त्या कार्यरत असल्याचे समजते तर, एकबोटे नगरसेविका असून त्यांचे पती डॉ. गजानन एकबोटे संस्थाचालक आहे आणि त्यांचे भाऊ मिलिंद एकबोटे, गजानन एकबोटे हे एक ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ आणि सर्जन आहेत, तर मिलिंद एकबोटे हे 'समस्त हिंदू आघाडी'चे प्रमुख आणि हिंदुत्ववादी नेते आहे. हे दोघे सख्खे भाऊ असून, दोघेही पुण्यात विविध क्षेत्रांत कार्यरत आहे. तर मिलिंद एकबोटे यांचे संभाजी भिडे कनेक्शन सर्वश्रुत आहे. संभाजी भिडे आणि मिलिंद एकबोटे हे महाराष्ट्रातील कट्टर हिंदुत्ववादी नेते आहेत. ते प्रामुख्याने १ जानेवारी २०१८ रोजी घडलेल्या भिमा-कोरेगाव हिंसाचार प्रकरणातील कथित सूत्रधार म्हणून ओळखले जातात. आंबे खाल्याने मुले होतात असे थोतांड सांगणारे आणि पेपर लिक करून 'नीट' होणारे यांची कुंडली कशी जुळते? असा प्रश्न पडतो. त्याही पुढे राजकीय क्षेत्रातील अनेकांशी नाळ जुळलेली असल्याची चर्चाही होत आलेली आहे. खरे म्हणजे NEET ही स्पर्धा परीक्षा प्रवेशासाठीची परीक्षा आहे. स्पर्धा निर्माण केव्हा होईल, जेव्हा स्पर्धक मोठ्या प्रमाणात उतरतील तेव्हा. भारतीय शिक्षण व्यवस्थेत ज्या समाजघटकांना वर्षोंवर्षे शिक्षण बंदी होती, ते आता शिक्षणाच्या प्रांतात मोठ्या प्रमाणावर प्रविष्ट होऊ लागल्याने मूठवर प्रस्थापित समाजाची मक्तेदारी मोडीत निघाली, त्यामुळे स्पर्धा निर्माण झाली. अर्थात, प्रस्थापितांशी बरोबरी करुन नवी ज्ञानाची क्षेत्रे मिळवण्यासाठी नवे स्पर्धक उदयास आले. NEET, JEE, सारख्या परीक्षा त्याचाच परिपाक होय. या परीक्षांची सुरुवात फार पूर्वीची नाही, अगदी अलिकडे झालेली आहे आणि या स्पर्धेत धडक मारणारे नवे स्पर्धक म्हणजे मोठ्या प्रमाणात मुली, ओबीसी, दलित, आदिवासी ही शूद्रातिशूद्र वर्णातील 'एकलव्य' आता उच्चजातसत्ताक शिक्षणव्यवस्थेसमोर उभे ठाकलेले आव्हान आहे. त्यामुळे परीक्षा पद्धती अधिकाधिक गुंतागुंतीची, महागडी केली जात असल्याने त्याबद्दल आक्रोश असते. तरी विद्यार्थी जिद्दीने पेटून तिथपर्यंत पोचण्यासाठी प्रयत्न करत असतात. विशिष्ट बुद्धीवंतांचे प्राबल्य व नियंत्रण असलेल्या परीक्षा पद्धतीतून रडीचा डाव रचून या देशात मूठभरांचे वर्चस्व प्रत्येक क्षेत्रात ठेऊ इच्छित असल्याने पेपर फुटीसारखे प्रकार होत आहे अशा विद्यार्थी आणि पालकांच्या भावना होत आहे. नोकरभरती संदर्भात इतर स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. स्पर्धा परीक्षा आयोजन, मूल्यमापन इ. करणारी एक यंत्रणा असून त्या यंत्रणेच्या माध्यमातून होणाऱ्या भरती प्रक्रियेवर अनेकदा आक्षेपार्ह प्रतिक्रिया दिसून येतात. लेखी प्रेलिम, मेन परीक्षेत उत्तम कामगिरी करुनही मुलाखतीसारख्या मूल्यमापन प्रकारात, ज्यात पूर्वग्रह डोकावण्याची शक्यता असते, नेमके मागासवर्गीय विद्यार्थ्यांना डावलून गुणदानात भेदभावपूर्ण अन्याय होत असल्याचे दावे होत आलेले आहेत. त्याहीपल्याड लॅटरल एन्ट्री प्रकाराने मोक्याच्या जागी विशिष्ट समाजाच्या एकाधिकारशाही गाजवण्याचा प्रकार म्हणजे कळसच. पेपरलिकचे प्रकरण उघडकीस आले म्हणून हा गैरप्रकार लोकांपर्यंत पोहोचला. आजवर लपूनछपून असे किती गैरप्रकार चालत असतील आणि जीव तोडून मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांवर किती अन्याय होत असेल, हे वेगळे सांगण्याची गरजच पडत नाही! भारतीय शिक्षण-परीक्षापद्धती नोकरभरती अशा संचलन करणाऱ्या महत्त्वपूर्ण यंत्रणांमध्ये उच्च जातीय प्राबल्य व नियंत्रण आहे. अजूनही मागासवर्गाचे पुरेसे प्रतिनिधित्व याठिकाणी निर्णय प्रक्रीयेत नसल्याची चर्चा होत असते. त्यामुळे उच्चजातीय हितसंबंध जपण्यासाठी पोषक घटकांची सहज जुळवाजुळव





शक्य होते. समाजातील मूठभर प्रस्थापित लोकांच्या वर्चस्ववादी वृत्तीमुळे बहुसंख्य लोकांना अडवून ठेवणं म्हणजे देशहितविरोधी षडयंत्रच होय. शिक्षण, साहित्य, क्रीडा, संस्कृती, सत्ता, संपन्नता सर्व क्षेत्रात याची किंमत देशाला भोगावी लागत असते. सत्ता संपत्ती अधिकार यांचे केंद्रीकरण आणि जातीअहंकारानं फुशारकी मारणारे मूठभर वर्चस्ववादी मात्र जागतिक स्तरावर तोंडघशी पडतात. जागतिक स्तरावरील अनेक बाबतीत रँकिंगमध्ये मग आरोग्य, पत्रकारिता, शिक्षण असो वा जीवनमान असो, देशाचे स्थान काय याची उद्विग्न चर्चा असते. आता फुटबॉल विश्वचषक स्पर्धा भरलेली आहे आणि त्यात अगदी चिमुकले असे देश प्रशंसनीय कामगिरी करत आहे. तिथे आम्ही अपात्र. ऑलिंपिक मधील नेहमीच पाचवीला पुजलेली अपयशाची परंपरा म्हणजे हाराकिरी. जगात लोकसंख्येच्या बाबतीत आघाडीवर तरी या देशातील अस्सल प्रतिभेला कुस्करून राजकीय वरदहस्ताने देशाचे प्रतिनिधित्व करणारे काय दिवे लावतात, ते बघून वारंवार जनप्रक्षोभ उसळत असतो, आणि 'आम्ही भारताचे लोक' विश्वगुरू होण्याची वल्गना ऐकून ऐकून कंटाळलेले असतात. या देशात डॉक्टर या व्यवसायास एकप्रकारे वेगळीच प्रतिष्ठा मिळालेली आहे. अत्युच्च बुद्धीमत्ता असलेले विद्यार्थी या अभ्यासक्रमाकडे झेपावतात. असा साधारणपणे लोकांचा समज राहिलेला आहे.

NEET ही परीक्षा पास होऊन डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून विद्यार्थी जीव तोडून मेहनत करतात. नियोजितपणे नवव्या वर्गापासूनच साधारणतः विद्यार्थी दिशा ठरवून तयारीला लागतात. या विद्यार्थ्यांच्या मागे अवघे कुटुंब उभे असते. अभ्यासाकरिता वातावरण उपलब्धतेपासून तर आर्थिक पाठबळ उभे करून ही वैद्यकीय प्रवेश परीक्षा पास करून वैद्यकीय महाविद्यालय सर करण्याचे ध्येय गाठण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावण्यापेक्षा कमी नसते. खरे म्हणजे देशहिताच्या दृष्टीने नागरिकांना उत्तम आरोग्य सोयी देणे गरजेचे आहे. त्यासाठी अधिक प्रमाणावर वैद्यकीय महाविद्यालये लोककल्याणकारी सरकारने उभे करण्याला प्राधान्य हवे. वाढत्या महाग खाजगी वैद्यकीय सोयींची सुळसुळाट थोपवण्यासाठी भरीव उपाययोजना आवश्यक आहे. जिल्हा रुग्णालयाचे एम्सच्या धर्तीवर अद्ययावतीकरण करता आले तर निरामय भारत दिसल्याशिवाय राहणार नाही. मोफत वैद्यकीय शिक्षण आणि सर्व सोयीनिशी सुसज्ज एम्ससारखे दवाखाने व मोफत उपचार सरकारी योजनेतून चालू शकतात. त्यासाठी पैसा अजिबात कमी पडणार नाही. कारण अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे सांगितले जाते. पण आरोग्य, शिक्षण, शेती, ग्रामीण या घटकांवर लक्ष्य केंद्रित न होता धृविकरणाच्या राजकारणात धर्मस्थळे अग्रक्रमावर आलेली दिसतात. त्यामुळे अजुनही पुरेशी वैद्यकीय सुविधा पुरवण्यात व्यवस्था विफल झालेली असते. लोकप्रतिनिधींना विकास कामासाठी मिळणारा निधी धार्मिक स्थळांसाठी वापरुन 'अमूकअमूक लोकप्रतिनिधीच्या सौजन्याने' असे फलक दिमाखात मिरवत असलेले दिसतात. आपल्याकडे ८००० माणसांमागे एक मंदिर आहे आणि ८८००० माणसांमागे एक दवाखाना आहे. हेच प्रमाण उलट असते तर कोरोनामुळे पन्नास लाख लोकांना जीव गमवावा लागला नसता. या पैशातून प्रयोगशाळा उभारल्या गेल्या तर आपल्या देशातल्या तरुणांनी नवनवीन शोध लावून जगात आपल्या देशाची मान उंचावली असती. पण असे होत नाही. जी वैद्यकीय व्यवस्था आहे, त्यातील प्रवेशाची जी परीक्षा पद्धती आहे, त्या व्यवस्थेतही समाजद्रोही अशाप्रकारे गैरप्रकार करतात आणि यात अनेक बहुसंख्य तरुणी होतकरू ओबीसी, भटके, दलित, आदिवासी असे मध्यमवर्गीय, मागास समाजातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात मुसंडी मारु लागलेले असताना त्यांचे पंख छाटू पाहणारे पेपरलिक प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. त्या प्रकरणात अडकलेले मासे आणि त्यांचे कपटी मनसुबे जगजाहीर होत आहे. विद्यार्थीकेंद्री जनआंदोलन उभे राहत असून व्यापक पाठिंबा मिळत आहे. मात्र राजकीय सामाजिक बदलासह समाजव्यवस्थेत सर्व समाज घटकांचा पुरेशा प्रमाणात सहभाग वाढत नाही तोवर खऱ्या अर्थाने न्याय होणार नाही. ●●



अनुज हुलके,
9823883541

# मुंडे यांची बदली केल्यास जनतेच्या नाराजीस शासन जबाबदार ठरेल!

एखाद्या व्यक्तीने संविधानिक मार्गाने कार्य करण्याचे ठरविले, तर देश सुदृढ, सक्षम आणि भ्रष्टाचारमुक्त होऊ शकतो, हे वारंवार सिद्ध झाले आहे. एखाद्या गावाला योग्य, कर्तबगार आणि प्रामाणिक सरपंच लाभला, तर त्या गावाचा सर्वांगीण विकास होतो, हे महाराष्ट्रातील अनेक गावांनी अनुभवले आहे.



संविधानाने आपल्या देशाला शासन, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि पत्रकारिता असे चार महत्त्वाचे स्तंभ दिले आहेत. आजच्या काळात या चारही स्तंभांवर विविध प्रकारची आव्हाने निर्माण झाली आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मात्र अशा परिस्थितीतही काही अधिकारी आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून कोणत्याही दबावाला बळी पडत नाहीत. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे मा. तुकाराम मुंडे. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी विविध विभागांमध्ये कार्य करताना आपल्या कर्तव्यदक्षतेची आणि प्रामाणिकतेची छाप पाडली आहे. सध्या त्यांनी अन्नातील भेसळ, निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ आणि जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध कठोर कारवाई करून सर्वसामान्य नागरिकांमध्ये विश्वास निर्माण केला आहे. वडापाव, कचोरी यांसारखे गरम पदार्थ वर्तमानपत्रावर देऊ नयेत, कारण त्यावरील शाई आरोग्यासाठी घातक ठरू शकते, हे अनेकांना माहीत होते; परंतु त्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी नव्हते. आज अनेक दूध उत्पादक, खाद्यतेल उत्पादक आणि अन्न प्रक्रिया उद्योग तपासणीच्या कक्षेत आले आहेत. गुटखा, तंबाखू आणि इतर आरोग्याला हानीकारक पदार्थांवरही नियंत्रण आणण्याचा प्रयत्न होत आहे. नफा कमावण्यासाठी काही लोक समाजाच्या आरोग्याशी खेळतात. अशा प्रवृत्तींवर अंकुश ठेवण्यासाठी कठोर आणि निडर अधिकारी आवश्यक असतात. तुकाराम मुंडे यांनी हे काम प्रभावीपणे करून दाखविले आहे. जर शासनाने नियमानुसार कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची बदली केली, तर जनतेमध्ये नाराजी निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे शासनाविरोधात जनमत तयार होऊ शकते. कारण जनतेच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी सुरू असलेल्या मोहिमेवर परिणाम होईल, अशी भीती अनेक नागरिक व्यक्त करत आहेत. या विषयावर आम्ही विविध क्षेत्रांतील नागरिकांशी चर्चा केली. त्यामध्ये व्यावसायिक, पत्रकार, शेतकरी, विद्यार्थी आणि सामान्य नागरिक यांचा समावेश होता. बहुसंख्य लोकांचे मत असे आहे की, मुंडे साहेबांनी या विभागात आपला नियमानुसार कार्यकाळ पूर्ण करावा. त्यांच्या कार्यामुळे किमान भेसळयुक्त अन्नाविरोधात प्रभावी कारवाई होत असल्याचा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला आहे. आता निर्णय शासनाच्या हाती आहे. जनतेच्या भावना आणि आरोग्याच्या हिताचा विचार करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी अपेक्षा आहे. तूर्त थांबतो. ●●



विजय पोहनकर
मो. 9579141618

# विमान अपघाता वेळी पायलट Mayday असे का म्हणतो?





आपातकालीन परिस्थितीत प्रशासनाकडून किंवा तिथल्या जबाबदार अधिकाऱ्यांकडून कोड वर्डचा वापर करण्यात येतो. Mayday या शब्दाचा वापर पायलटसह सर्व एअरलाइन्स क्रू मेंबर्स एक दुसऱ्या सोबत बोलताना या कोडवर्ड चा संकेत देतात. हे कोडवर्ड सर्व क्रू मेंबर्सना अलर्ट करतात. आपातकालीन परिस्थितीत पायलट Mayday हा शब्द तीन वेळा बोलतात. यामुळे क्रू मेंबर्स अलर्ट होतात. पायलटकडून या शब्दांचा वापर नेहमी केला जात नाही. पण या कोडवर्डचा वापर करण्याऐवजी पायलट थेट का बोलत नाहीत. कारण विमानात प्रवास करणाऱ्या प्रवाशांना धोक्याची सूचना मिळाली तर ते घाबरतील आणि फ्लाइटमध्ये धावपळ निर्माण होईल. यामुळे पायलट या कोड वर्डचा वापर करतात. Mayday या शब्दाचा वापर डिस्ट्रेस कॉलमध्ये केला जातो. याचा अर्थ विमान आणि प्रवाशांच्या जीवाला धोका आहे आणि त्यांना मदतीची गरज आहे. आपातकालीन स्थितीत रेडिओ हस्तक्षेप आणि गोंधळाचे वातावरण असल्यामुळे पायलटला हा शब्द तीन वेळा बोलावा लागतो. Mayday शब्दाची सुरुवात १९२० मध्ये झाली. या दरम्यान लंडनच्या क्रॉडॉन एअरपोर्टवर रेडिओ ऑफिसर फ्रेडरिक स्टॅनली मॉकफॉर्ड यांनी सगळ्यात पहिले या शब्दाचा वापर केला. त्यांनी फ्रेंच शब्द 'm'aider' चा वापर करून Mayday शब्द तयार झाला. 'm'aider' या फ्रेंच शब्दाचा अर्थ 'माझी मदत करा' असा आहे.●●

- अभिव्यक्ती

## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १८९

**डॉ. बासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा चिंचोळा अडेगाव ता. देवळी. जि. वर्धा**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मुख्य चौकात असून येथिल लोक येथे एकत्र येतात. दिनविशेष कार्यक्रम आयोजित करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशानुसार येथिल लोक शिक्षण घेऊन संघटित आहेत. चिंचोळा चळवळीचे ठिकाण आहे.

संवाद मित्र, राजू थुल
मो. 9423420031

# राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा भारतीय संविधानावर प्रभाव



महाराष्ट्र ऑफिसर फोरमतर्फे आयोजित परिसंवादात अभ्यासपूर्ण मंथन

**नागपूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि शिक्षणविषयक विचारांचा भारतीय संविधानावर झालेला प्रभाव अधोरेखित करणारा परिसंवाद डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, नागपूर येथे उत्साहात पार पडला. महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमच्या वतीने शाहू महाराज जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात विविध मान्यवरांनी विचार मांडले. निवृत्त सनदी अधिकारी किशोर गजभिये यांनी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना शाहू महाराजांनी शिक्षणाचा प्रसार, पहिले आरक्षण, सामाजिक न्याय आणि प्रशासनातील प्रतिनिधित्वासाठी केलेले कार्य भारतीय राज्यघटनेत प्रतिबिंबित झाल्याचे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व घटनात्मक विचारांवर शाहू महाराजांच्या कार्याचा मोठा प्रभाव असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरकारला जाब विचारला पाहिजे असे बोलतांना गजभिये यांनी बेरोजगारी आणि आर्थिक विषमता दूर करण्यासाठी शासनाने शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी धोरणांचा आदर्श घ्यावा, अशी मागणी केली. तसेच केजी ते पीजीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा आणि राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी नमूद केले. ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रगतीसाठी शाहू महाराजांनी केलेले कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे असून समाज त्यांच्या ऋणात असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावेळी काही समाजघटकांनी विरोध केला असला, तरी शाहू महाराज आपल्या धोरणांवर ठाम राहिल्याचा उल्लेख गजभिये यांनी केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमचे अध्यक्ष तथा माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे होते. प्रमुख वक्त्यांमध्ये लेखक-समीक्षक डॉ. संजय शेंडे यांनी आपल्या भाषणात तत्कालीन परिस्थितीचे विश्लेषण करताना आज डॉ. आंबेडकरांच्या विचारांची गरज प्रतिपादन केली. दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजूरकर यांनी विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र ऑफिसर फोरमने दैनिक बहुजन सौरभच्या वाचक वाढी करता प्रयत्न केले पाहिजे असे सांगत मूकनायकच्या शताब्दी वर्षात बहुजन सौरभ सुरू झाल्याचे सांगत आर्थिक अडचणींचा सामना करत हे वर्तमानपत्र लोकांपर्यंत पोहोचत आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन आणि प्रास्ताविक महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमचे महासचिव सच्चिदानंद दारूंडे यांनी केले. आभार राष्ट्रपाल तेलतुमडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संविधान प्रास्ताविकेचे वाचन धर्मेश फुसाटे यांनी केले. कार्यक्रमाला प्रामुख्याने प्रभु राजगडकर, डॉ. जयराम खोब्रागडे, डॉ. सरोज आगलावे, डॉ. सरोज डांगे, डॉ. सविता कांबळे, डॉ. त्रिलोक हजारे, प्रशांत फुलझेले, सुमेध कांबळे, डॉ. नलिनी भोयर, वासुदेव फुसाटे, कमलाकर डोंगरे, डी.डी. गोंडाने, वसंत मोहिले, धनविजय, डॉ. बी.के. मेश्राम, संजय भगत, सुधीर वाळके आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



# वैचारिक साहित्य शोषणमुक्तीचा लढा देते : डॉ. अजय चिकाटे

**नागपूर :** मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर समता प्रस्थापित करणे आवश्यक आहे. वैचारिक साहित्य हा समाजाचा प्राण असून त्याच्या वाचनामुळे व्यक्तीच्या विचारविश्वाला व्यापक दिशा मिळते. चांगले-वाईट याची जाणीव निर्माण होते. आंबेडकरी साहित्य हे ऊर्जावान असून वैचारिक साहित्य शोषणमुक्तीचा लढा देत असते, असे प्रतिपादन डॉ. अजय चिकाटे यांनी अध्यक्षीय भाषणात केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २९ जून १९२८ रोजी सुरू केलेल्या समता वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते . यानिमित्त परिवर्तन विचार मंच ने लोक सहभागातून महाड जन्मशताब्दी बाग येथील फलकाचे अनावरण करण्यात आले. तसेच वट्टथाई बुद्ध विहार येथे दुसऱ्या लेखक संवाद परिषदेचे आयोजन केले होते . या परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. अजय चिकाटे होते. उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास मंडळ, नांदेडचे समन्वयक वैभव मुनेश्वर उपस्थित होते. प्रमुख अतिथी डॉ. प्रकाश राठोड, तर स्वागताध्यक्ष म्हणून भदंत नागदीपंकर उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणात वैभव मुनेश्वर म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विपुल साहित्याचे वाचन करून त्यानुसार आचरण केले, तरच डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला समताधिष्ठित समाज निर्माण होऊ शकतो. प्रमुख अतिथी डॉ. प्रकाश राठोड यांनी, कोणतेही साहित्य मूल्यांच्या चौकटीत असले पाहिजे. लेखन ही एक साधना असून समाजात जाणीव निर्माण करणारे साहित्यच खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवू शकते, असे प्रतिपादन केले. स्वागताध्यक्ष भदंत नागदीपंकर यांनी, थायलंडमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी वट्टथाई बुद्ध विहाराची निर्मिती केली आहे. यावेळी वैभव मुनेश्वर यांचा विलास गजभिये व भीमराव गायकवाड यांच्या हस्ते सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुजाता लोखंडे यांनी केले. संचालन प्रीती तिरपुडे यांनी केले. संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन ज्योत्स्ना बनसोड यांनी केले, तर आभार प्रदर्शन शालिनी मेश्राम यांनी मानले. या लेखक संवाद परिषदेला प्रा. राम घोडेस्वार, विलास गजभिये, प्रा. भीमराव गायकवाड, नरेश मेश्राम, दिनकर मडकवाडे, श्रीराम बनसोड, डॉ. सूर्यकांता पाटील, डॉ. मुकुंद मेश्राम, भीमराव म्हैसकर, राहुल मेश्राम, रवी नितनवरे, भूपेश वराडे, रामजी माटे, मालती वराडे, सुधा बामणपलीवार, डॉ. अशोकानंद देशभ्रतार, डॉ. माधव जांभुळे, शुद्धोधन बडवणे, पद्मा बहादूरे, चरणदास वैरागडे यांच्यासह अनेक साहित्यिक, अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## महत्वाचे

### आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ मातंगासह ५८ जातींचा आंदोलनाचा इशारा

**नागपूर :** आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ सकल मातंग समाज, नागपूरच्या वतीने भव्य लक्षवेधी आंदोलनाचे आयोजन करण्यात आले असून, मंगळवार दि. 30 जून रोजी सकाळी 10 वाजता यशवंत स्टेडियम ते संविधान चौकापर्यंत हे आंदोलन पार पडणार आहे. आरक्षण उपवर्गीकरण समर्थन मोर्चा समितीच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, यशवंत स्टेडियम येथून आंदोलनाला सुरुवात होणार असून संविधान चौक येथे आंदोलनाचा समारोप होईल. आरक्षणाचा लाभ समाजातील सर्व वंचित घटकांपर्यंत न्याय्य पद्धतीने पोहोचावा, तसेच समान हक्क आणि समान संधी मिळाव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. सकल मातंग समाजासह चर्मकार, खाटीक, बुरड, वाल्मिकी, मांग गारुडी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी समाजबांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. 'हक्क आमचा, निर्णय आमचा' आणि 'न्याय, हक्क व स्वाभिमान' या घोषणांसह आंदोलनाद्वारे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या आंदोलनात समाजातील विविध संघटना, युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी सहभागी होऊन आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीला बळ द्यावे, असे आवाहन आरक्षण उपवर्गीकरण समर्थन मोर्चा समिती नागपूरच्यावतीने केले आहे. आंदोलनाच्या माध्यमातून समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी एकजूट दाखवून शासनापर्यंत आपली भूमिका ठामपणे पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कृती समितीच्या प्रमुख पदाधिकारी यांनी कळविले आहे.

### कांशीराम वाचनालयात पोलिओ लसीकरण





**नागपूर :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अंतर्गत दक्षिण नागपूरच्या न्यू कैलास नगरातील मान्यवर कांशीरामजी सार्वजनिक वाचनालयातील बूथ क्रमांक 18 वर पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेची सुरुवात बसपा नेते उत्तम शेवडे यांनी छोट्या बाळाला लस पाजून केली. याप्रसंगी आशा वर्कर सुषमा गोडघाटे व नर्स खुशबू वासनिक प्रामुख्याने उपस्थित होत्या. या केंद्रावर 178 बालकांना पोलिओ डोस पाजण्यात आला. हे पल्स पोलिओ लसीकरण केंद्र अभियानाच्या सुरुवातीपासून सुरू आहे.

### माता रमाई आंबेडकर व कवी वामनदादा कर्डक यांना ३० जून काव्यात्मक अभिवादन



**नागपूर :** माता रमाई आंबेडकर आणि महान लोकशाहीर कवी वामनदादा कर्डक यांना काव्यात्मक अभिवादन करण्यासाठी नागपुरात ३० जून २०२६ रोजी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संथागार फाउंडेशन, १९५२ ची महिला क्रांती परिषद समिती, सम्यक म्युझिकल ग्रुप मनीष नगर आणि महिला संघटना, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉन्फरन्स हॉल, ऊर्वेला कॉलनी, नागपूर येथे आयोजित केला आहे. कार्यक्रमाला बहुजन सौरभच्या निवासी संपादक प्रा. संध्या राजुरकर, राष्ट्रीय पारिवारिक धम्म संघटनेच्या अध्यक्षा पुष्पा बौद्ध, धम्मदिना वाचनालय, नागपूरचे अध्यक्षा प्रा. डॉ. सरोज आगलावे तसेच संथागार फाउंडेशनचे संस्थापक डॉ. एम.एस. जांभुळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात सम्यक म्युझिकल ग्रुपचे संचालक नरेश धोपटे यांच्या नेतृत्वाखाली सांस्कृतिक सादरीकरण होणार आहे. तसेच डॉ. एम.एस. जांभुळे लिखित 'रमाई तू महान' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात येणार असून, डॉ. वीणा राऊत यांच्या दिग्दर्शनाखाली सम्राट अशोक या लघुनाट्याचे सादरीकरणही होईल. याशिवाय माता रमाई आंबेडकर आणि वामनदादा कर्डक यांच्या जीवनकार्यावर आधारित गीत, कविता आणि काव्याभिवादनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आयोजकांनी सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आंबेडकरी विचारवंतांची ऐतिहासिक बैठक

## दीक्षाभूमी विस्तारीकरणासाठी १ जुलैच्या जनआंदोलनाला एकमुखी पाठिंबा

**नागपूर :** दीक्षाभूमीच्या विकास व विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेली केंद्रीय कापूस संशोधन संस्था (CICR) अंतर्गत कृषी विभागाची जमीन मिळावी, या मागणीसाठी बानाई, उरुवेला कॉलनी, नागपूर येथे आंबेडकरी विचारवंतांची विशेष बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या बैठकीला विविध क्षेत्रांतील ज्येष्ठ विचारवंत, अभ्यासक, प्राध्यापक, लेखक, सामाजिक कार्यकर्ते तसेच आंबेडकरी चळवळीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. बैठकीत १ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या जनआंदोलनाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थितांनी आंदोलन अधिक प्रभावी करण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना, मार्गदर्शन आणि विधायक मते मांडली.

दीक्षाभूमीच्या विकासाच्या महत्त्वाच्या प्रश्नावर विविध क्षेत्रांतील आंबेडकरी विचारवंत एकाच व्यासपीठावर एकत्र येऊन सखोल चर्चा करणे ही ऐतिहासिक व प्रेरणादायी घटना असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

बैठकीत दीक्षाभूमीच्या विस्तारीकरणासाठी CICR कृषी विभागाची जमीन मिळालीच पाहिजे, या मागणीला सर्वांनी एकमुखी पाठिंबा दर्शविला. ही लढाई आवश्यक असेल तोपर्यंत लढण्याचा तसेच १ जुलैच्या जनआंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धारही सर्वांनी व्यक्त केला.



बैठकीच्या अध्यक्षस्थानी त्रिलोक हजारे होते. यावेळी माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, किशोर गजभिये, श्याम तागडे, एन.व्ही. ढोके, आशीष फुलझेले, एस.के. गजभिये, शशिकांत हूमणे, धर्मेश प्रसेनजीत, उषा बौद्ध, पुष्पा बौद्ध, प्रा. डॉ. सरोज डांगे, श्यामकुवर, राहुल परुळकर, रजत महेशगवळी, पद्माकर गणवीर, भास्कर हिरवाले, सच्चिदानंद दारुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीचे आयोजन विशाल आर्यबोधी, अविनाश कठाणे, सुनील वाकोडे, राज रक्षित, डॉ. तक्षील वासनिक, रजनी पिल्लेवान, माया पाटील, माधुरी पाटील, रेखा रामटेके, अल्का गजभिये तसेच इतर कार्यकर्त्यांनी केले.बैठकीत दीक्षाभूमीच्या विकासासाठी समाजाची एकजूट हीच या जनआंदोलनाची सर्वात मोठी ताकद असल्याचा विश्वास व्यक्त केला.

# लोकशाही जिवंत ठेवणारे शाहू महाराज : अमोल मिटकरी

**अकोला :** छत्रपती शाहू स्मारकामुळे तुमच्या मुलांचे भविष्य उज्वल होणार आहे. शाहू स्मारकातर्फे समस्त महापुरुषांच्या जयंती साजरी करून समानतेचा विचार पेरण्याचे काम होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. करविर संस्थानच्या राज्याने लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम केल्याचे प्रतिपादन आ. अमोल मिटकरी बोलतांना म्हणाले.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय जवान विकास दामोदर होते तर प्रमुख मार्गदर्शन व शाहू फाऊंडेशनचे निर्माता आ. अमोल मिटकरी, प्रमुख पाहुणे म्हणून, प्रवीण लोखंडे (साखर उपसंचालक सह. आयुक्त, नागपूर) नगरसेवक शंकरराव लंगोटे, राहूल इंगळे, पत्रकार तथा गाथा रमाईकार पंजाबराव वर, राहूल इंगोले, आर्टिस्ट चौथे, खिरोडकर उपस्थित होते.

साखर उपसंचालक सह. आयुक्त, प्रवीण लोखंडे बोलतांना म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांनी सर्व समाजाच्या मुलांनी शिकले पाहिजे म्हणून शाळा व वस्तीगृहाची निर्मिती केली. त्यांचा विचार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये अंगीकृत करून सर्व समाजाच्या मुला-मुलींच्या मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. यावेळी राहूल इंगळे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी राणी गावंडे, किरण व वानखडे यांनी जयंती निमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाला सतीश चौके, माणिकराव वाहूरवाघ, यशवंतराव देशमुख, दामोदर, प्रवीण गोपनारायण, बाबाराव साखरे, श्रावण फाले, संतोष शिंदे, अनिल मेघने, आलाराम जाधव, काळे साहेब, ढग साहेब, सदानंद मोहाडे, यश गावंडे, बोकाडे, दीपक चौधरी, स्वनील गोपनारायण, काकडे, नागे होते. कार्यक्रमच संचालन डॉ. निलेश वानखडे यांनी केले तर आभार प्रदर्शन अनिल मेघाने यांनी केले. छत्रपती शाहू नगर महिला प्रतिष्ठान, खडकी अकोला यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# संविधानाला बळ देण्यासाठी प्रत्येकाने कार्य केले पाहिजे : अंजली धानोरकर

**पुणे :** महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार व विचार प्रसारक संस्था, पुणे यांच्या वतीने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भारतीय संविधान आणि सध्याची स्थिती' या विषयावर अप्पर जिल्हाधिकारी (छत्रपती संभाजीनगर) अंजली धानोरकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष एस. एम. डावरे होते. व्यासपीठावर चंद्रकांत काळे, तुकाराम डावरे, प्रा. आर.आर. सोनकांबळे आणि अंकुश सवाखंडे उपस्थित होते.



व्याख्यानात अंजली धानोरकर म्हणाल्या की, भारतीय संविधान अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जागरूक मतदार आणि जबाबदार नागरिक म्हणून कार्य केले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३१ च्या गोलमेज परिषदेत भारतातील जातिव्यवस्थेचे वास्तव, तिचे सामाजिक व आर्थिक परिणाम आणि त्यावरील उपाय तथ्यांच्या आधारे जगासमोर मांडले. ते केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर भारताला दिशा देणारे आणि जागतिक विचारांचे नेतृत्व करणारे महान व्यक्तिमत्त्व होते. यावेळी सेवानिवृत्त सहाय्यक जिल्हाधिकारी सुनिता गायकवाड यांचा अंजली धानोरकर व एस.एम. डावरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस.एम. डावरे यांनी केले. परिचय तुकाराम डावरे, संचालन प्रा. आर.आर. सोनकांबळे, तर आभार प्रदर्शन अंकुश सवाखंडे यांनी केले. कार्यक्रमास ॲड. एल.टी. सावंत, महेंद्र शिंदे, ॲड. होवोल प्रकाश, जी.आर. कांबळे, ननावरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मोझरी-कौंडण्यापूरसाठी कोट्यवधींचा निधी; भीमटेकडी आणि नया अकोला अस्थिभूमी उपेक्षित का? सागर भवते

**तिवसा :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची कर्मभूमी गुरुकुंज मोझरी, माता रुक्मिणीचे माहेरघर कौंडण्यापूर तसेच संत गाडगेबाबा निर्वाणभूमी वलगाव येथील पुनर्विकासासाठी एकूण ७३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र, बौद्ध समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या कौंडण्यापूर येथील भीमटेकडी आणि नया अकोला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिभूमीच्या विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते यांनी केला आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात भवते यांनी म्हटले आहे की, २०१४ ते २०१९ या पंचवार्षिक विकास आराखड्यात मोझरीच्या विकासासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी ७० कोटी रुपये प्राप्त झाले. तसेच कौंडण्यापूरच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन विविध कामे पूर्ण झाली. आता २०२६ मध्ये वलगाव, मोझरी आणि कौंडण्यापूर येथील देखभाल व दुरुस्तीसाठी पुन्हा ७३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे.





भवते यांच्या मते, हिंदू धार्मिक स्थळांच्या विकासासाठी वारंवार मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केला जात असताना, बौद्ध समाजाच्या श्रद्धास्थानांकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे. कौंडण्यापूर येथील भीमटेकडीसाठी २०२३ मध्ये केवळ २० लाख रुपयांचे सभागृह मंजूर करून औपचारिकता पूर्ण करण्यात आली. तसेच नया अकोला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिभूमी आजही मूलभूत विकासापासून वंचित असल्याचा आरोप त्यांनी केला. तिवसा मतदारसंघात विकासकामांमध्ये भेदभाव होत असून 'विकासाची अस्पृश्यता' आजही कायम असल्याचे या घटनांवरून स्पष्ट होत असल्याचा दावा भवते यांनी केला आहे.

यासंदर्भात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिभूमी, नया अकोला आणि कौंडण्यापूर येथील भीमटेकडीच्या विकासासाठी लवकरच पत्रकार परिषद घेऊन पुढील आंदोलनाची दिशा जाहीर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विकासकामात समानतेची अपेक्षा सागर भवते यांनी म्हटले आहे की, लोकप्रतिनिधी हे संपूर्ण मतदारसंघातील सर्वधर्मीय नागरिकांचे प्रतिनिधी असतात. त्यामुळे विकासकामांमध्ये कोणत्याही धर्म, जात किंवा समाजावर आधारित भेदभाव न करता सर्व श्रद्धास्थानांना समान न्याय मिळणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींच्या विकासकामातून भारतीय राज्यघटनेतील समानतेची मूल्ये प्रतिबिंबित व्हावीत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# व्यसनमुक्ती जनजागृतीतील उत्कृष्ट कार्याबद्दल उत्कर्ष बहुउद्देशीय संस्था

**नागपूर :** 'नशा मुक्त भारत अभियान' अंतर्गत व्यसनमुक्ती जनजागृतीसाठी उल्लेखनीय उपक्रम राबविल्याबद्दल उत्कर्ष बहुउद्देशीय संस्थेचा सामाजिक न्याय विभागातर्फे सन्मान करण्यात आला. राजर्षी शाहू महाराज जयंती आणि आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ विरोधी दिनानिमित्त आयोजित संयुक्त कार्यक्रमात समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते संस्थेच्या सचिव संगीता आळणे यांना स्मृतिचिन्ह, संविधान उद्देशिकेची प्रत आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाच्या सहकार्याने संस्थेने १७ ते २६ जून या 'नशा मुक्त भारत अभियान' सप्ताहात व्यसनमुक्तीविषयक पथनाट्य, व्याख्याने, सह्यांची मोहीम, पोस्टर प्रदर्शन, व्यसनमुक्ती प्रतिज्ञा आणि शॉर्ट फिल्म आदी विविध जनजागृती उपक्रम राबवून समाजात व्यसनांचे दुष्परिणाम व त्यावरील उपायांची प्रभावी माहिती पोहोचविली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून महावितरणचे अभियंता राजेश नाईक उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नागरिक, उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्था, विद्यार्थी तसेच आंतरजातीय विवाह करणाऱ्या लाभार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला ताराचंद पखिडे, अवनी वेखंडे, सपना पेंदाम, योगेश कढव, अक्षय भाटी यांच्यासह समाज कल्याण विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले. नंदकिशोर भुडके यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले, प्रफुल्ल गोहते यांनी व्यसनमुक्तीची सामूहिक प्रतिज्ञा दिली. संचालन शितल गडलिंग यांनी केले, तर जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी सुखदेव कौरती यांनी आभार मानले.



# लघुपट 'घोंचु' (द इडियट) प्रीमियर शो

**नागपूर :** रिदम डान्सिंग अकादमी आणि मुन मुन फिल्म्स निर्मित 'घोंचु' (द इडियट) या लघुपटाचा प्रीमियर शो २६/६/२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह, उर्वेला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर येथे मोठ्या थाटात झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. निलकांत कुलसंगे, गित एवं नाट्य प्रभागचे माजी डायरेक्टर, मुख्य अतिथी सुबोध नागदेवे, निर्माता-दिग्दर्शक, सुप्रसिद्ध आंबेडकरी गायक अनिरुध्द शेवाळे, आवाज इंडिया चॅनेलचे डायरेक्टर प्रितम प्रियदर्शी, प्रा. विकास पील्लेवान, लेखक-दिग्दर्शक आदी उपस्थीत होते. छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. या प्रसंगी मान्यवरांच्य हस्ते सर्व कलावंत, लेखक दिग्दर्शक निर्माता हेमंत चव्हाण यांनी मुख्य भूमिका साकारली असून, त्यांच्यासोबत विद्या खोब्रागडे, संजय सायरे, रोशन खोब्रागडे, शिल्पा मकेश्वर, रॉकी महाजन, सीमा सुजवार, ज्योत्स्ना बन्सोड, भार्गवी बावनकर, वैभवी बावनकर, प्रमोद श्रीरामे, राजू वनकर आणि बाल कलाकार मीना यादव, कॅमेरामेन विलास पिल्लेवान, कॅमेरा एडिटिर अविनाश शेवाळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच चित्रपटाच्या निर्मितीत सहकार्य करणारे, तसेच, कामगार कल्याण मंडळाच्या स्पर्धेत अभिनयाचे उत्कृष्ट पुरस्कार मिळाल्याबद्दल सारनाथ रामटेके, यांचा तर चित्रपट क्षेत्रात अनेक वर्षांपासून कार्यरत कुंदन सोनटक्के, यांचाही सत्कार करण्यात आला. यानंतर घोंचू या चित्रपटाचे प्रदर्शन भव्य एल डी वर करण्यात आले. 'घोंचु' या लघुपट निर्मीतीचा उद्देश नागपूर मधील नवीन कलाकारांना संधी देणे आणि नागपूरमधील चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन देणे हा आहे. सर्व मान्यवरांनी चित्रपटांचे चिकित्सक समिक्षण करून चित्रपटाला सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमात, प्रबुद्ध नाटककार भानुदास जिवने, आत्माराम ढोक, कवी संजय गोडघाटे, रंगराजन गोस्वामी, राजन गोंडाने, सुनील शेंडे, रत्नपाल गोटेकर, गौतम मेश्राम, संजय खोब्रागडे आदी प्रबुद्ध नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संजय सायरे तर आभार विद्या खोब्रागडे यांनी केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648